Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोकिलकूजितानि



66 म
१२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

दुय्यम शाळांसाठी संस्कृत भाषेतील उत्तमोत्तम वेंचे

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्
पुस्तक संख्या...... 66 म / १२
पञ्जिका संख्या...... २०१६३

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुय्यम शाळांसाठीं संस्कृत भाषेंतील उत्तमोत्तम वेंचे

कोकिल - कूजितानि

(प्रथमा माला)

CHECKED
Initial

कूजन्तं राम रामेति मधुरं मधुराक्षरम्
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥

सङ्ग्राहक

पु. ना. वीरकर, एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन),

ॲसिस्टंट सुपरिन्टेन्डन्ट, न्यू इंग्लिश स्कूल, सातारा,
दाजी हरि वाडेगांवकर गोल्ड मेडॅलिस्ट,
खा. ब. एच्. एम्. मलक गोल्ड मेडॅलिस्ट,
सरस्वतीबाई कोल्ते गोल्ड मेडॅलिस्ट, व
के. ई. एम्. पोस्ट ग्रॅज्युएट स्कॉलर

स्टाक प्रमाणीकरण
92
2/9/63

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

किंमत ९ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथमावृत्ति : १९४०

(सर्व हक्क स्वाधीन)

Printed by M. N. Kulkarni, at the Karnatak Printing Press, Karnatak House, Chira Bazar, Bombay 2, and published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परमपूज्य तीर्थरूप
कै. रा. रा. नारायण गणेश वीरकर
यांच्या पवित्र स्मृतीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

—०—

' संस्कृत भाषा ' हे शब्द सध्यांच्या दिवसांत उच्चारले, कीं धर्मग्रन्थ, नीतिग्रन्थ, पौराणिक कथा, इसापनीति पद्धतीच्या कोल्ह्याकुत्र्यांच्या गोष्टी, व्याकरणाचीं दुर्बोध रूपें, लांबलचक समास, अशासारखीं हजारों चित्रें ऐकणाराच्या डोळ्यांपुढून भराभर सरकून जातात. यामुळें त्याच्या मनांत संस्कृत भाषेबद्दल भीति व अप्रीति निर्माण होतात. असें होऊं नये, आणि संस्कृत भाषा ही खरोखर देववाणी या संज्ञेस पात्र आहे, संस्कृत वाङ्मय हें खरोखरच वाङ्मयाच्या सर्व प्रकारांनीं समृद्ध आहे, आकर्षक आहे, तासचे तास मनाला रिझविणारें आहे, व त्याबरोबरच मनावर सर्वोत्कृष्ट संस्कार घडवून आणून त्याचा अत्युच्च विकास करणारें आहे, अशी खात्री पटून विद्यार्थी या गीर्वाणभारतीच्या नैसर्गिक गुणसम्पदेवर लुब्ध व्हावेत, हा हें पुस्तक जनतेस सादर करण्याचा मुख्य उद्देश होय. " Respect is commanded, not demanded " असें इंग्रजींत एक वचन आहे. त्या दृष्टीनें पाहतां. संस्कृत पाठ्य-पुस्तक **केवळ** बाह्यतः सजवून, किंवा संस्कृत भाषेचे नुसतेच गोडवे गाऊन, " तिच्याकडे कृपादृष्टीनें पहा" अशी लोकांजवळ याचना करणें, म्हणजे तिला थोड्याफार प्रमाणांत कमी लेखण्यासारखें वाटतें. असें म्हणण्यानें बाह्य सजावटीचें महत्त्व कमी करण्याचा मुळींच हेतु नाहीं; पण केवळ तेवढेंच केलें असतां संस्कृत भाषेला योग्य ती किंमत दिली जाईल, असें समजणें चुकीचें आहे. विद्यार्थी ज्यायोगें तिच्या **अंगच्या गुणांकडे** आपोआप आकर्षिले जातील, आणि तिच्या सौन्दर्याचा नुसता साक्षात्कार होतांच त्यांचें मन ज्यायोगें उल्हसित व विकसित होईल, अशाच प्रकारचें तिचें स्वरूप संस्कृत पाठ्य-पुस्तकांतून लोकांपुढें ठेवणें आवश्यक आहे. म्हणूनच **साहित्याच्या सर्व अङ्गोपाङ्गांतील विविधता** हें या पुस्तकाच्या ठळक वैशिष्ट्यांपैकीं एक व्हावें, यासाठीं सङ्ग्राहकानें यथाशक्ति प्रयत्न केले आहेत. प्रतिपाद्य विषय, व त्याला साहित्यांत प्राप्त होणारीं विविध स्वरूपें (Forms) यांचा विचार करितां, नाट्य, कथा, गद्यकाव्य, चुटके, समस्या, प्रहसनें, अशा अनेक वाङ्मयप्रकारांचा, आणि काव्यपूर्ण निसर्गवर्णन, ऐतिहासिक प्रसंग, युक्तिवाद अगर भाषणांतील वकिली डावपेंच, संगीतासारख्या कलेचा प्रभाव, अशा कित्येक विषयांचा समावेश तर या पुस्तकांत झाला आहेच, पण शिवाय यांपैकीं अनेकांतहि शक्य तेवढें वैचित्र्य आण-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याचा प्रयत्न केला गेला आहे. भिन्नभिन्न प्रकारच्या गोष्टी (पाठ, ४, ६, ११, १३, १५, २२); सुभाषितांचा मक्ता केवळ भर्तृहरीला किंवा जगन्नाथालाहि दिलेला नसून प्रत्येक संस्कृत महाकवीची वाणी सुभाषितमयच आहे, हें दर्शविणारे सुभाषितसङ्ग्रह व इतर पाठ (५, १२, २१, २०, १७, ८, १८, ११, १०, १६, ४, ७); क्वचित् थोड्या कृत्रिमतेचा भास झाला, तरी नादमाधुर्यानें तो भास लुप्त करून आनंदानें नाचावयासच लावणारीं कवनें (२, २३); सहजस्फूर्त व प्रासादिक अशा नाना प्रकारच्या रचनांनीं एकच विषय प्रतिपादन करून आणि एकाच गोष्टीस समर्पक व नवीन नवीन असे भरपूर दृष्टान्त देऊन बुद्धीला रमविणारे प्रतिभाविलास (२, ७, १८); स्वभावरेखन, नाट्यपूर्ण प्रसंग, संभाषणचातुर्य, यांपैकीं एक अगर अधिक गुणांनीं परिपूर्ण असलेले नाट्यप्रवेश व इतर कांहीं पाठ (७, १६, २०, १०, ४); असे एक ना दोन, कितीतरी उतारे या पुस्तकांत मुद्दाम घेतले गेले आहेत.

पाठांत अशी विविधता आणि नावीन्य तर असावींच, पण त्यासाठीं संस्कृत भाषेंतील अवघड (म्हणजे पांचव्या इयत्तेंतील, किंवा जरूर तर निदान सहावींतील मुलांच्या शक्तीबाहेरचे) उतारे घेण्याचा प्रसंग तर येऊं नये, म्हणून **संस्कृत-चन्द्रिके**सारख्या दुर्मिळ झालेल्या मासिकांतून, **रसगङ्गाधरा**सारख्या गहन व **सङ्गीतरत्नाकरा**सारख्या शास्त्रीय ग्रन्थांतून, आणि प्रचलित संस्कृत नियतकालिकां-तूनहि मुलांस समजेल व आवडेल असाच भाग निवडून घेण्याचे कामीं सङ्ग्राह-कानें कसूर केलेली नाहीं. जातां जातां या ठिकाणीं सांगावेंसें वाटतें, कीं या पुस्तकांतील पुष्कळसे–आणि कठीण भासणारे सर्वच–पाठ संग्राहकानें **पांचव्या इयत्तेंतील मुलांस प्रत्यक्ष शिकवून,** ते त्यांच्या आटोक्यापलीकडील नाहींत असें पाहिल्यावर मगच प्रस्तुत पुस्तकांत कायम केले आहेत.

याशिवाय, या पुस्तकांतील पाठ एकामागून एक वाचतांना मुलांस मुळींच कंटाळल्यासारखें वाटूं नये, यासाठीं **जागोजाग विनोदी उतारे** घातलेले आढळतील (३, ६, ९, १४, १९). त्यांच्या आणि १३ व १६ या पाठांच्या वाचनावरून संस्कृत वाङ्मयांतील विनोद एकाच ठशाचा नसून बहुविध आहे, हें दिसून येईल. ग्रन्थकारांकडे पाहिलें तरीहि असेंच प्रतीत होईल, कीं **आदिकवीपासून तों आज-कालच्या पंडितांपर्यंत** निरनिराळ्या काळीं होऊन गेलेल्या महाकवींच्या व विद्वान् लेखकांच्या उताऱ्यांचा समावेश यांत केला गेला आहे. १३ व १५ यांसारखे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ पाहिले, म्हणजे 'संस्कृतभाषा ही आतां मृतभाषा झाली' असें म्हणण्याचें धाष्टर्य कदापि होऊं शकणार नाहीं.

मानसशास्त्रदृष्ट्या कौमार्यावस्था (Adolescence) हा विभूतिपूजेचा काळ होय. या काळांत विद्यार्थ्यांच्या मनांवर विशाल ध्येयें बिंबू लागतात. म्हणून उत्तमोत्तम ध्येयांचे आणि उदात्त स्वभावांचे आदर्श मुलांमुलींसमोर ठेवणें, हा या काळांतील शिक्षणाचा मुख्य उद्देश होय. हें तत्त्व ध्यानांत ठेवून, आणि शिकविण्याच्या विषयाच्या दृष्टीनें पहातां, संस्कृत वाङ्मयाच्या वाचनानें मुलांमुलींच्या मनावर स्वाभाविकपणें व्हावयास पाहिजेत असेच नैतिक व सांस्कृतिक सुपरिणाम होतील अशी काळजी घेऊन, प्रस्तुत पुस्तकांतील उतारे घेतले आहेत. आदर्श शाळेसंबंधीं लिहितांना **सर पर्सी नन्** (Sir Percy Nunn) हा पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतो :— " The School should reflect only what is best and most vital in the outer world." तोच नियम या पाठ्य-पुस्तकाचे बाबतींतहि लागू करून, पुस्तक अतिशय मनोरंजक तर व्हावेंच, पण त्याबरोबरच **उदात्त ध्येयें व थोर थोर स्त्रीपुरुषस्वभावांचे आदर्श मुलांमुलींपुढें ठेवले जाऊन त्यांच्या चारित्र्यविकासास शक्य तेवढी मदत व्हावी,** या विचाराचा विसर संस्कृत भाषेंतील उतारे घेतांना संग्राहकानें स्वतःस पडूं दिलेला नाहीं. (७, १०, १५, १८, २०, २२, हे पाठ, व ५, १२, २१, हे सुभाषितसंग्रह पहा).

प्रत्येक उताऱ्याचें रसग्रहण आणि त्यांतील भाषासौंदर्याचें समीक्षण करण्याचे कामीं अभ्यासकांस शक्य तेवढी मदत व्हावी, म्हणून **उताऱ्याचे आरंभीं अवश्य तेथें 'परिचय' व उताऱ्याचें थोडक्यांत वैशिष्ट्य, हीं दिलेलीं आहेत आणि** विस्ताराचा दोष पत्करूनहि पुस्तकाचे शेवटीं भरपूर टीपा दिलेल्या आहेत. हीच दृष्टि संग्राहकानें दर चारपांच उताऱ्यांनंतर "अभ्यास" या सदराखालील प्रश्न लिहितांना ठेवलेली आहे. व्याकरणविषयक प्रश्नांवर फारसा भर न देतां, स्वभावचित्र रेखाटणें, पुस्तकांतच असलेलीं समानार्थक सुभाषितें शोधून काढणें, पुस्तकांतील सुभाषितसंग्रहांतून एखाद्या धड्याला मथळा शोभेल असें वाक्य निवडणें, अशा प्रकारचे **मुलांच्या विचारांस चालना देणारे, व अभ्यासाकडे त्यांचें लक्ष आपोआप वेधून घेणारे प्रश्न** यांत मुख्यतः आले आहेत. शिवाय, **मुलांस भाषासौंदर्याचें आकलन होऊन सुंदर सुंदर वाक्प्रचार त्यांनीं आत्मसात् करावेत,** याकरितां प्रत्येक उताऱ्यांतून वाक्प्रचार निवडून त्यांवर प्रश्न घालण्यांत आले आहेत. सर्वोत्कृष्ट श्लोक व वचनें मुलांमुलींनीं मुखोद्गत करावींत, म्हणून पाठांतराचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकेक प्रश्नहि प्रत्येक 'अभ्यासांत' समाविष्ट केला आहे. शेवटीं, एकदोन शब्दांतच ज्यांचीं उत्तरें देतां येतील, असे संस्कृत भाषेंतून विचारिलेले प्रश्नहि संग्राहकानें या सदरास जोडले आहेत.

गेलीं तीनचार वर्षें पडून राहिलेलें प्रस्तुत पुस्तक तयार करण्याचें काम माझे मित्र डॉ. मो. ना. आगाशे यांच्या तगाद्याशिवाय मीं पुनः येवढ्या लौकर व इतक्या उत्साहानें हातीं घेतलेंच नसतें. आमच्या शाळेंतील शिक्षक माझे मित्र श्री. वा. ह. क्षीरसागर यांनीं तर महिनेच्या महिने माझ्या बरोबरीनें श्रम करून माझा कार्यभाग पुष्कळच हलका केला. त्याचप्रमाणें श्री. अ. वि. फडके, श्री. शे. ल. कालगांवकर, श्री. म. सी. आपटीकर, श्री. ज. के. रानडे व श्री. रा. ग. कुंभोजकर या सद्‌गृहस्थांनीं मला वेळोवेळीं अतिशय आपलेपणानें मदत केली आहे. श्री. रा. रा. नांदेडकर यांनीं जवळजवळ सर्वच पुस्तकाचें अत्यंत नमुनेदार हस्तलिखित तयार करून माझे लिहिण्याचे कितीतरी श्रम वांचविले. श्री. बा. मा. खुपेरकर शास्त्री, प्रो. वा. गो. परांजपे, प्रो. चिं. रा. देवधर, प्रो. रा. ना. दांडेकर, प्रो. श्री. रा. पारसनीस व प्रो. वा. वि. मिराशी (नागपूर) यांनीं पुस्तकाचें हस्तलिखित वाचून मला पुष्कळ सूचना केल्या. चित्रकार श्री. गोलिवडेकर यांनींहि वेळांत वेळ काढून पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील सुन्दर चित्र काढून दिलें. वरील सर्व सहायकांचा मी अत्यंत ऋणी आहें. शेवटीं, कर्नाटक छापखान्याचे मालक श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनीं प्रकाशनाचें काम हातीं घेऊन तें अत्यंत उत्तम प्रकारें व लौकर पार पाडलें, याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

जगांत कोणतीहि मानवी कृति सर्वांगपरिपूर्ण असूं शकत नाहीं. तेव्हां या पुस्तकांत अजूनहि कांहीं दोष व उणीवा राहिल्या असतील, याची मला जाणीव आहे. म्हणून **सुधारणांसंबंधीं योग्य त्या सूचना कोणी मजकडे पाठविल्यास मी त्यांचा आभारी होईन, आणि दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं त्यांचा अवश्य उपयोग करीन,** असें आश्वासन देतों. शेवटीं, या पुस्तकाच्या वाचनानें कांहीं वाचकांसहि संस्कृत वाङ्मयाबद्दल प्रीति उत्पन्न झाली, व त्याचा अधिक अभ्यास करावासें वाटूं लागलें, तर माझ्या परिश्रमाचें चीज झाल्याचें समाधान मला लाभेल, व प्रस्तुत पुस्तकाचा दुसरा भाग तयार करण्यास मला अधिकच उत्साह वाटेल, इतकें सांगून ही प्रस्तावना पुरी करितों.

न्यू इंग्लिश स्कूल, सातारा.
बलिप्रतिपदा, शके १८६२.

पु. ना. वीरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवळ शिक्षकांसाठीं

१. **'सोप्यापासून कठिणाकडे'** हें तत्त्व शक्य तों पाळूनच प्रस्तुत पुस्तकांतील पाठांचा क्रम आंखला गेला आहे. मात्र एकाच प्रकारचे पाठ एकमेकांजवळ येऊं नयेत, यासाठीं प्रत्येक ठिकाणीं हें तत्त्व अगदीं तंतोतंत पाळलें गेलें आहे, असें नाहीं.

२. शिक्षकांनींहि पुस्तक शिकवितांना अगदीं ओळीनेंच सर्व पाठ घेतले पाहिजेत, असा आग्रह नाहीं. एक गोष्ट मात्र सांगावीशी वाटते, कीं पांचव्या इयत्तेला एका वर्षांत सर्व पाठ शिकवून होतीलच, असें नसल्यानें कांहीं पाठ गाळण्याचा प्रसंग येईल. ते गाळतांना प्रथम एकाच प्रकारचे एकाहून अधिक पाठ जेथें आढळतील, त्यांपैकीं एकेक गाळावा. उदा०—पाठ ६, ११ व १५ यांपैकीं एक अगर दोन; १४ व १९ यांपैकीं एक, असा गाळण्याचा प्रघात ठेवावा.

३. पुस्तकांतील पाठांचा क्रम आंखतांना कांहीं गट पाडण्यांत आले आहेत. अभ्यास हें सदर आलें, कीं एक गट संपला असें समजावें. एका वर्षांत, **प्रत्येक गटांतील कांहीं (व अखेर अखेरच्या गटांतील शक्य तेवढे) पाठ शिकविले जावेत.** सुभाषितसंग्रह मात्र शक्य तों सर्व घ्यावेत, व आवश्यक वाटल्यासच प्रत्येक संग्रहांतील थोडासा मजकूर वगळावा.

४. **मुलांनीं रसग्रहण आणि भाषासौंदर्याचें समीक्षण पूर्णपणें करावें हेंच ध्येय** शिक्षकांनीं प्रस्तुत पुस्तकांतील प्रत्येक उतारा शिकवितांना आपल्यापुढें ठेवावें. यासाठीं प्रत्येक पाठाचे आरंभीं दिलेला 'परिचय', व टीपांमधील रसग्रहण आणि भाषासौंदर्यसमीक्षण यांना उपकारक असलेला सर्व भाग, या दोहोंचा शक्य तेवढा उपयोग केला जावा.

५. व्याकरणविषयक टीपा या पुस्तकांत अपुऱ्या आहेत असें नाहीं, **पण हें पुस्तक शिकवितांना पाठांबद्दल अप्रीति उत्पन्न होईल इतका भर व्याकरणावर देऊं नये.** लांबलांब समासांचे विग्रह, क्लिष्ट रूपें, कठीण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा अनावश्यक असलेली व्युत्पत्ति, जेथें अर्थाची थोडीफार ओढाताण करावी लागते असे शब्दप्रयोग, इत्यादि गोष्टी टाळाव्यात. कारण, हें पुस्तक शिकविण्याचा उद्देश उत्कृष्ट संस्कृत वाङ्मय वाचलें जाऊन संस्कृत वाङ्मयाबद्दल मुलांस गोडी वाटूं लागावी हा आहे, हें विसरूं नये. **अशीं टाळण्याजोगीं स्थळें सांपडणें सोपें जावें, म्हणून त्या त्या पाठांत तीं बारीक टाइपांत छापिलीं आहेत. त्यांच्या नुसत्या अर्थांपलीकडे त्यांसंबंधीं अधिक कांहीं सांगितलें नाहीं, तर बरें.**

६. पुस्तकांतील पुष्कळसे कठीण उतारे संग्राहकानें पांचव्या इयत्तेंतील मुलांस प्रत्यक्ष शिकवून पाहिले आहेत. तथापि, बारीक टाइपांतील स्थळें वगळूनहि कांहीं उतारे मुलांच्या शक्तीबाहेरचे आहेत असें कांहींजणांच्या नजरेस आलेंच, तर तेवढे उतारे सहावीसाठीं शिल्लक ठेवावेत.

७. 'अभ्यास' या सदराला पाठाइतकेंच महत्त्व दिलें जावें. विशेषतः शेवटच्या दोनतीन 'अभ्यासां'तील प्रत्येक प्रश्न घेतला जावा. प्रयोग बदलणें, अशासारखा प्रश्न एकवेळ राहिला तरी चालेल; **पण मुलांच्या विचारास चालना देणारे, मुलांची शब्दसंपत्ति वाढविणारे, व वाक्प्रचारांच्या उपयोगांसंबंधींचे प्रश्न मात्र गाळले जाऊं नयेत, अशी इच्छा आहे.** एकच गोष्ट शब्दांत थोडथोडा बदल करून निरनिराळ्या प्रकारांनीं व अधिकाधिक सरसपणें कशी सांगतां येते, यासंबंधींची दृष्टि शिकवितां शिकवितां मुलांस द्यावी. उदा०—'विपत्काळीं अमृतहि विष बनतें' हीच गोष्ट संस्कृतांत 'विपदि सुधाऽपि विषं भवति, विषतां याति, विषतां व्रजति, विषतां भजते, विषताम् उपैति, विषायते इत्यादि कितीतरी प्रकारांनीं सांगतां येईल. असेच प्रकार मुलांना ठिकठिकाणीं करून पहाण्यास सांगावें.

८. समानार्थक सुभाषितें शोधून काढणें, स्वभावचित्र रेखाटावयास सांगितलें असतां नुसते गुणदोष सांगत न बसतां पुस्तकांतून वाक्यें व प्रसंग उद्धृत करणें, अशा तऱ्हेच्या संवयी मुलांनीं मराठी व इंग्रजी विषयांचे बाबतींतहि लावून घ्याव्यात, असें त्यांस अवश्य सांगावें. तसेंच, कोणत्याहि भाषेवर प्रभुत्व संपादन करण्यासाठीं त्यांतील उत्तम उत्तम वाक्प्रचार आपलेसे करणें आवश्यक आहे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हेंहि त्यांच्या मनावर बिंबवावें. यासाठीं पाठान्तराचें महत्त्व फार असल्यानें, 'अभ्यासां'तील पाठान्तरासाठीं दिलेले उतारे तर मुलांकडून पाठ करून घेतले जावेतच; पण त्याहूनहि त्यांचेकडून जितकें अधिक पाठ होईल, तितकें बरें.

९. शेवटीं, चारित्र्यविकास हें प्रस्तुत पुस्तकाचें एक प्रमुख उद्दिष्ट होय, हें ध्यानांत ठेवून, ज्या ज्या पाठांत ज्या ज्या ठिकाणीं ध्येयाची किंवा स्वभावाची उदात्तता आढळून येईल, त्या त्या ठिकाणीं ती मुलांस पूर्णपणें दाखविल्यावांचून राहूं नये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

	पृष्ठांक
१ मङ्गलाचरणम् ।	१
२ सुधांशुवर्णनम् ।	१
३ परीक्षार्थिनो धूर्तस्य ।	२
४ अपि दानं दोषाय ।	४
५ सूक्तिसुधातुषाराः । (प्रथमो निस्यन्दः)	४
अभ्यास	६
६ स्वजातिर्दुरतिक्रमा ।	६
७ प्रमदाः पतिवर्त्मगाः ।	८
८ सङ्गीतप्रभावः ।	१०
९ मुहूर्तं मनोविनोदनम् । (१)	११
अभ्यास	१२
१० शल्यसारथ्यस्वीकारः ।	१३
११ आपत्सु मित्रं जानीयात् ।	१४
१२ सूक्तिसुधातुषाराः । (द्वितीयो निस्यन्दः)	१८
१३ नारदगर्वपरिहारः ।	२०
१४ मुहूर्तं मनोविनोदनम् । (२)	२२
अभ्यास	२३
१५ हंसो हंसो बको बकः ।	२४
१६ रमणीयः कथायोगः ।	२६
१७ विश्वासो नैव कर्तव्यो दुर्जनेषु विजानता ।	३०
१८ सद्भृत्यलक्षणानि ।	३२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९ मुहूर्तं मनोविनोदनम् । (३) ३२
अभ्यास ३४
२० आर्यचन्दनदासो वधस्तंभं नीयते । ३५
२१ सूक्तिसुधातुषाराः । (तृतीयो निस्यन्दः) ३८
२२ भोजमुद्दिश्य कालिदासस्य चरमग्रन्थः । ४०
२३ परमेश्वर परिपालय । ४१
अभ्यास ४२
टीपा, रसग्रहण, इत्यादि ४४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१.—मङ्गलाचरणम्

॥ श्रीगणेशायनमः ॥

तवामृतस्यन्दिनि पादपङ्कजे निवेशितात्मा कथमन्यदिच्छति
स्थितोऽरविन्दे मकरन्दनिर्भरे मधुव्रतो नेक्षुरसं समीक्षते ॥ १ ॥

करारविन्देन पदारविन्दं मुखारविन्दे विनिवेशयन्तम्
वटस्य पत्रस्य पुटे शयानं बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ॥ २ ॥

तमोगणविनाशिनी सकलकालमुद्द्योतिनी
धरातलविहारिणी जडसमाजविद्वेषिणी ॥
कलानिधिसहायिनी लसदलोलसौदामिनी
मदन्तरवलम्बिनी भवतु काऽपि कादम्बिनी ॥ ३ ॥

२.—सुधांशुवर्णनम्

कवीन्दुं नौमि वाल्मीकिं यस्य रामायणीं कथाम्
चन्द्रिकामिव चिन्वन्ति चकोरा इव साधवः ॥

परिचय :—रावणाच्या राजवाड्यांत हनुमान् सीतेचा शोध करीत फिरत असतां त्याला चान्दण्याची जी रमणीय शोभा दिसली ती खालील उताऱ्यांत वर्णिली आहे. यांतील सर्वच कविता नादमधुर असून त्यांतील कित्येक उपमाहि बहारीच्या आहेत.

सूचना :—या धड्यांतील कांहीं शब्द व कांहीं रूपें मुलांस जरा अपरिचित वाटण्याचा संभव असल्यामुळें जरूर तर आणखी कांहीं धडे झाल्यानंतर हा घ्यावा. या पुस्तकांत ह्यास अग्रस्थान देण्याचें कारण केवळ तो आदिकवीचा आहे येवढेंच होय.

ततः स मध्यंगतमंशुमन्तं ज्योत्स्नावितानं मुहुरुद्वमन्तम्
ददर्श धीमान् भुवि भानुमन्तं गोष्ठे वृषं मत्तमिव भ्रमन्तम् ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकस्य पापानि विनाशयन्तं महोदधिं चापि समेधयन्तम्
भूतानि सर्वाणि विराजयन्तं ददर्श शीतांशुमथाभियान्तम् ॥ २ ॥

या भाति लक्ष्मीर्भुवि मन्दरस्था यथा प्रदोषेषु च सागरस्था
तथैव तोयेषु च पुष्करस्था रराज सा चारुनिशाकरस्था ॥ ३ ॥

हंसो यथा राजतपंजरस्थः सिंहो यथा मन्दरकन्दरस्थः
वीरो यथा गर्वितकुञ्जरस्थश्चन्द्रोऽपि बभ्राज तथाऽम्बरस्थः ॥ ४ ॥

शिलातलं प्राप्य यथा मृगेन्द्रो महारणं प्राप्य यथा गजेन्द्रः
राज्यं समासाद्य यथा नरेन्द्रस्तथा प्रकाशो विरराज चन्द्रः ॥ ५ ॥

—रामायणे सुन्दरकाण्डे वाल्मीकिः ।

लालयन्तमरविन्दवनानि क्षालयन्तमभितो भुवनानि
पालयन्तमथ कोककुलानि ज्योतिषां पतिमहं महयामि ॥

—प्रसन्नराघवे जयदेवः ।

३.—परीक्षार्थिनो धूर्तस्य

हा पाठ वाचणाऱ्या मुलांचा संस्कृतशीं नुकताच कोठें परिचय झालेला असणार. तेव्हां आपल्यासारखा नुकताच संस्कृत शिकूं लागलेला विद्यार्थीहि शब्दावर कोटि करून कसा विनोद निर्माण करूं शकतो हें त्यांस या पाठांत दिसून येईल.

आसीत् कश्चिद्विदुषां पुरस्कर्ता । कदाचित्कोऽपि धूर्तस्तस्य समीपमागत्य प्राह स्म । भोः परीक्षतां मां भवानिति । स चैनं विद्वांसं मन्वानः समुचित आसन उपवेश्य सविनयमुपरचिताञ्जलिः प्रोवाच किमधीते भवानिति ।

धूर्तः—सर्वम् ।

पुरस्कर्ता—तत् कस्मिन् विषये भवन्तं परीक्षेय ।

धूर्तः—तद्भवानेव चिन्तयतु ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कर्ता—अपि जानाति भावो व्याकरणम् ।

धूर्तः—न ।

पुरस्कर्ता—किं तर्हि न्यायमधीषे ।

धूर्तः—न ।

पुरस्कर्ता—तत्किमु तर्कशास्त्रं पठसि ।

धूर्तः—तदपि न ।

पुरस्कर्ता—किं तर्हि साङ्ख्यं योगं वा वेद भवान् ।

धूर्तः—नैतयोर्नामापि मया श्रुतम् ।

पुरस्कर्ता—तत्किं मीमांसां परिशीलयस्याहोस्विद्ब्रह्मविद्याम् ।

धूर्तः—न ।

पुरस्कर्ता—अथ साहित्यज्ञो भवान् ।

धूर्तः—नहि नहि ।

पुरस्कर्ता—कतमस्तर्हि वेदोऽधीतो भावेन ।

धूर्तः—(क्रोधमभिनीय) किमेवमन्यदेव मां पृच्छसि । केन वा ते प्रोक्तं मया व्याकरणादिकमधीतमिति, येन वृथाप्रश्नैरात्मानं मां चायासयसि ।

पुरस्कर्ता—ननूक्तमेव भावेन सर्वमधीय इति ।

धूर्तः—कथमेतदपि न जानासि । न मया वेदः शास्त्रं वा किमप्यधीतं, किं तु नवीनोऽहं संस्कृतभाषाया अध्येता शब्दरूपावलिं पठन् 'सर्व'शब्दमधीय, इत्यत एवाब्रवं 'सर्व'मधीय इति, भवान्पुनरन्यदेव पृच्छति ।

—संस्कृतचन्द्रिकायाम् ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४.—अपि दानं दोषाय

कदाचिद्राजानं निरन्तरं ददानमालोक्य मुख्यामात्यो वक्तुमशक्तो राज्ञः शयनभवनभित्तौ व्यक्तान्यक्षराणि लिखितवान्—

'आपदर्थं धनं रक्षेत्'

राजा शयनादुत्थितो गच्छन् भित्तौ तान्यक्षराणि वीक्ष्य स्वयं द्वितीयचरणं लिलेख—

'श्रीमतामापदः कुतः'

अपरेद्युरमात्यो द्वितीयं चरणं लिखितं दृष्ट्वा स्वयं तृतीयं लिलेख—

'सा चेदपगता लक्ष्मीः'

परेद्यू राजा चतुर्थं चरणं लिखति—

'सञ्चितार्थोऽपि नश्यति'

ततो मुख्यामात्यो राज्ञः पादयोः पतति—'देव, क्षन्तव्योऽयं ममापराधः'।

—भोजप्रबन्धे बल्लालसेनः।

५.—सूक्तिसुधातुषाराः

प्रथमो निस्यन्दः

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती
तस्माद्धि मधुरं काव्यं तस्मादपि सुभाषितम् ॥ १ ॥

द्राक्षा म्लानमुखी जाता शर्करा चाश्मतां गता
सुभाषितरसस्याग्रे सुधा भीता दिवं गता ॥ २ ॥

बुद्धिर्दीपकला लोके यया सर्वं प्रकाशते
अबुद्धिस्तामसी रात्रिर्यया किंचिन्न भासते ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किं कवेस्तेन काव्येन किं काण्डेन धनुष्मतः
परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः ॥ ४ ॥

तत्त्वं किमपि काव्यानां जानाति विरलो भुवि
मार्मिकः को मरन्दानामन्तरेण मधुव्रतम् ॥ ५ ॥

क्व शुक्तयः क्व वा मुक्ताः क्व पङ्कः क्व च पङ्कजम्
क्व मृगाः क्व च कस्तूरी धिग्विधातुर्विदग्धताम् ॥ ६ ॥

सद्भिस्तु लीलया प्रोक्तं शिलालिखितमक्षरम्
असद्भिः शपथेनोक्तं जले लिखितमक्षरम् ॥ ७ ॥

कीटोऽपि सुमनस्सङ्गादारोहति सतां शिरः
अश्मापि याति देवत्वं महद्भिः सुप्रतिष्ठितः ॥ ८ ॥

सत्सङ्गाद्भवति हि साधुता खलानां
साधूनां न हि खलसङ्गमात्खलत्वम् ।
आमोदं कुसुमभवं मृदेव धत्ते
मृद्गन्धं न हि कुसुमानि धारयन्ति ॥ ९ ॥

परार्थे यः पीडामनुभवति, भङ्गेऽपि मधुरो
यदीयः सर्वेषामिह खलु विकारोऽप्यभिमतः ।
न सम्प्राप्तो वृद्धिं यदि स भृशमक्षेत्रपतितः
किमिक्षोर्दोषोऽसौ, न पुनरगुणाया मरुभुवः ॥ १० ॥

गेयं गीतानामसहस्रं
ध्येयं श्रीपतिरूपमजस्रम् ॥
नेयं सज्जनसङ्गे चित्तं
देयं दीनजनाय च वित्तम् ॥ ११ ॥

कस्यचित्किमपि नो हरणीयं
मर्मवाक्यमपि नोच्चरणीयम् ॥
श्रीपतेः पदयुगं स्मरणीयम्
लीलया भवजलं तरणीयम् ॥ १२ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

प्र. १. पुढील श्लोक पाठ म्हणून दाखवा :—

(अ) करारविन्देन...

(ब) लोकस्य पापानि...

(क) हंसो यथा...

(ड) लालयन्तमरविन्द...

(ई) सत्सङ्गाद् भवति हि...

(फ) कस्यचित्किमपि नो...

प्र. २. शिकणें, माहीत असणें अशा अर्थाचे जेवढे शब्द तुम्हांला 'परीक्षार्थिनो धूर्तस्य' या धड्यांत आढळले असतील, तेवढे सर्व सांगा.

प्र. ३. वाक्यांत उपयोग करा :—

वृद्धिं प्राप्; अन्तरेण; क्व–क्व; चेत्; 'त्यापासून काय फायदा' या अर्थी 'किम्.'

प्र. ४ (अ) गोष्ठे मत्तो वृष इव चन्द्रः क्व भ्रमति । उपमानभूतस्य वृषस्य वर्णः कीदृशः भवेत् ।

(ब) अमात्येन यत् लिखितं, तत्तेन राज्ञे किं न निवेदितम् ।

(क) बुद्धेः को गुणः । अबुद्धिश्च कथं सर्वथैव निष्फला ।

६.—स्वजातिर्दुरतिक्रमा

पसंतीसाठीं जो जो वर पित्यानें आपणासमोर आणिला, त्याच्याहून अधिक चांगला वर पाहिजे असें म्हणतां म्हणतां कन्यारूपधारिणी मूषिकेचें मन अखेर स्वजातीयावरच बसून तिच्या मनाची आपोआपच कशी फसवणूक होते, हें खालील उताऱ्यांत दिसून येईल.

अस्ति गङ्गातीरे तपस्विभिराकीर्णमाश्रमपदम् । तत्र याज्ञवल्क्यो नाम कुलपतिरासीत् । तस्य जाह्नव्यां स्नात्वोपस्प्रष्टुमारब्धस्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतले श्येनमुखात्परिभ्रष्टा मूषिका पतिता। तां स्वतपोबलेन कन्यकां कृत्वा समादाय स्वाश्रममानिनाय। अनपत्यां च जायामाह। भद्रे, गृह्यतामियं दुहिता। प्रयत्नेन संवर्धनीया। ततस्तया संवर्धिता लालिता पालिता च सा विवाहयोग्या संजाता। तथाविधां तां दृष्ट्वा भर्तारं जायोवाच। भो भर्तः, किमिदं नावबुध्यसे, यथाऽस्याः स्वदुहितुर्विवाहसमयातिक्रमो भवति। असावाह–साधूक्तम्। अहमेनां सदृशाय प्रयच्छामि। उक्तं च।

कुलं च शीलं सनाथता च
विद्या च वित्तं च वपुर्वयश्च।
एतान्गुणान्सप्त विचिन्त्य देया
कन्या बुधैः शेषमचिन्तनीयम्॥

तद्यदस्या रोचते तदा भगवन्तमादित्यमाहूय तस्मै प्रयच्छामि। सा प्राह–क इह दोषः। क्रियतामेतत्। अथ मुनिना रविराहूतः। मुनिप्रभावात् तत्क्षणादेवाभ्युपगम्यादित्यः प्रोवाच। भगवन्, किमहमाहूतः। सोऽब्रवीत् 'एषा मदीया कन्यका तिष्ठति। यद्येषा त्वां वृणोति, तर्ह्युद्वहस्व' इति। एवमुक्त्वा स्वदुहितरमुवाच। पुत्रि, किं ते रोचत एष भगवांस्त्रैलोक्यदीपको भानुः। पुत्रिकाऽब्रवीत्। तात, अतिदहनात्मकोऽयम्, नाहमेनमभिलषामि। तस्मादन्यः प्रकृष्टतरः कश्चिदाहूयताम्'। अथ तस्यास्तद्वचनं श्रुत्वा मुनिर्भास्करमुवाच। भगवन्, त्वत्तोऽप्यधिकोऽस्ति कश्चित्। भास्करः प्राह–अस्ति मत्तोऽप्यधिको मेघः, येनाच्छादितोऽहमदृश्यो भवामि। अथ मुनिना मेघमप्याहूय कन्याऽभिहिता–पुत्रिके, अस्मै त्वां प्रयच्छामि। सा प्राह–कृष्णवर्णोऽयं जडात्मा च। तदस्मादन्यस्मै प्रधानाय कस्मैचिन्मां प्रयच्छ। अथ मुनिना मेघोऽपि पृष्टः। भो भो मेघ, त्वत्तोऽप्यधिकोऽस्ति कश्चित्?। मेघेनोक्तम्—मत्तोऽप्यधिकोऽस्ति वायुः। वायुनाऽऽहतोऽहं सहस्रधा यामि। तच्छ्रुत्वा मुनिना वायुराहूतः। आह च–किमेष वायुस्ते विवाहायोत्तमः प्रतिभाति। साऽब्रवीत्–तात, अतिचपलोऽयम्। तदस्मादप्यधिकः कश्चिदानीयताम्। मुनिराह–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वायो, त्वत्तोऽप्यधिकोऽस्ति कश्चित् ? । पवनेनोक्तम्—मत्तोऽप्यधिकोऽस्ति पर्वतो येन संस्तभ्य बलवानप्यहं ध्रियें । अथ मुनिः पर्वतमाहूय कन्यामुवाच-पुत्रिके, त्वामस्मै प्रयच्छामि । सा प्राह—कठिनात्मकोऽयं स्तब्धश्च । तदन्यस्मै देहि माम् । मुनिना पर्वतः पृष्टः-भोः पर्वतराज, त्वत्तोऽप्यधिकोऽस्ति कश्चित् ? । गिरिणोक्तम्-मत्तोऽप्यधिकाः सन्ति मूषिका ये मच्छरीरं बलाद्विदारयन्ति । ततो मुनिर्मूषिकमाहूय तस्या अदर्शयत् । आह च-पुत्रिके, त्वामस्मै प्रयच्छामि । किमेष प्रतिभाति ते मूषिकराजः । साऽपि तं दृष्ट्वा स्वजातीय एष इति मन्यमाना प्रहृष्टा सत्युवाच । तात, मां मूषिकां कृत्वाऽस्मै प्रयच्छ । येन स्वजातिविहितं गृहधर्ममनुतिष्ठामि । ततः सोऽपि स्वतपोबलेन तां मूषिकां कृत्वा तस्मै प्रादात् । अतोऽहं ब्रवीमि ।

सूर्यं भर्तारमुत्सृज्य पर्जन्यं मारुतं गिरिम् ।
स्वजातिं मूषिका प्राप्ता स्वजातिर्दुरतिक्रमा ॥

—पञ्चतन्त्रे ।

७.—प्रमदाः पतिवर्त्मगाः

शशिना सह याति कौमुदी सह मेघेन तडित्प्रलीयते
प्रमदाः पतिवर्त्मगा इति प्रतिपन्नं हि विचेतनैरपि ॥

—कुमारसम्भवे कालिदासः ।

परिचय—राम वनांत जाणार, ही कल्पनाहि नसतां दासीनें सहजगत्या कोठून तरी आणलेलीं वल्कलें आपणांस कशीं दिसतात, हें सीता पहात होती. वनांत जावयाचें ठरल्याबरोबर रामानें तीं वल्कलें सीतेजवळ मागितलीं. या त्याच्या मागणीनेंच खालील उताऱ्यास सुरुवात झाली आहे. चतुराईनें थोडेच शब्द बोलून सीता रामास कशी निरुत्तर करिते, हें यांत पाहण्यासारखें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(ततः प्रविशति रामः सीता लक्ष्मणश्च)

रामः—मैथिलि, आनय तावदनया दत्तानि वल्कलानि ।

सीता—गृह्णात्वार्यपुत्रः ।

रामः—मैथिलि, किं व्यवसितम् ।

सीता—ननु सहधर्मचारिणी खल्वहम् ।

रामः—मयैकाकिना किल गन्तव्यम् ।

सीता—अतो नु खल्वनुगच्छामि ।

रामः—वने खलु वस्तव्यम् ।

सीता—तत्खलु मे प्रासादः ।

रामः—श्वश्रूश्वशुरशुश्रूषापि च ते निर्वर्तयितव्या ।

सीता—एनामुद्दिश्य देवतानां प्रणामः क्रियते ।

रामः—लक्ष्मण, वार्यतामियम् ।

लक्ष्मणः—आर्य, नोत्सहे श्लाघनीये कार्ये वारयितुमत्रभवतीम् । कुतः ।

अनुचरति शशाङ्कं राहुदोषेऽपि तारा
पतति च वनवृक्षे याति भूमिं लता च ।
त्यजति न च करेणुः पङ्कलग्नं गजेन्द्रं
व्रजतु, चरतु धर्मं; भर्तृनाथा हि नार्यः ॥

—प्रतिमानाटके भासः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८.—सङ्गीतप्रभावः

यथा नयति कैलासं नगं गानसरस्वती
तथा नयति कैलासं न गङ्गा न सरस्वती ॥

सङ्गीताची महती आङ्ग्लकवींनींहि आपल्या कवितांतून गाइलेली आहे. खालील कवितांत, शङ्करापासून सर्पासारख्या दुष्ट प्राण्यापर्यंतच्या सर्व श्रोत्यांवर सङ्गीत आपली मोहिनी कशी घालितें, हें क्रमाक्रमानें दाखविण्यांत कवीचें कौशल्य दिसून येतें. नृत्य, गायन, आणि वादन या तिन्हींस मिळून सङ्गीत अशी संज्ञा आहे (नृत्यं गीतं च वाद्यं च त्रयं सङ्गीतमुच्यते), हें ध्यानांत ठेवावें.

गीतेन प्रीयते देवः सर्वज्ञः पार्वतीपतिः
गोपीपतिरनन्तोऽपि वंशध्वनिवशं गतः ॥ १ ॥

सामगीतिरतो ब्रह्मा, वीणासक्ता सरस्वती
किमन्ये देवगन्धर्वयक्षमानवदानवाः ॥ २ ॥

अज्ञातविषयास्वादो बालः पर्यङ्किकागतः
रुदन् गीतामृतं श्रुत्वा हर्षोत्कर्षं प्रपद्यते ॥ ३ ॥

वनेचरस्तृणाहारश्चित्रं मृगशिशुः पशुः
लुब्धो लुब्धकसङ्गीते गीते त्यजति जीवितम् ॥ ४ ॥

क्रुद्धो विषं बमन् सर्पः फणामान्दोलयन् मुहुः
गानं जाङ्गलिकाच्छ्रुत्वा हर्षोत्कर्षं प्रपद्यते ॥ ५ ॥

तस्य गीतस्य माहात्म्यं के प्रशंसितुमीशते
धर्मार्थकाममोक्षाणामिदमेवैकसाधनम् ॥ ६ ॥

—सङ्गीतरत्नाकरे ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९.—मुहूर्तं मनोविनोदनम् (१)

विदूषकाच्या साध्याभोळ्या व भोजनप्रिय स्वभावाचा फायदा घेऊन चेटी (दासी) त्याची कशी फजिती करिते हें दाखविणाऱ्या या उताऱ्यांतील विनोद मुलांची करमणूक करील.

(ततः प्रविशति तत इतः परिभ्रमन् विदूषकः चेटी च)

चेटी—सांप्रतमबहुकार्यतया नगरं प्रेक्षितुं निर्गताऽस्मि। (परिक्रम्यावलोक्य) अयि, एष आर्यसन्तुष्टो गच्छति। भवतु, एतेन सह हसन्ती मुहूर्तकं निर्वेदं विनोदयामि। (उपसृत्योर्ध्वमवलोक्य) हला, कौमुदिके। किं लब्धो ब्राह्मणः। किं भणसि। न लभ इति।

विदूषकः—चन्द्रिके, किमेतत्।

चेटी—आर्य, कश्चित् ब्राह्मणमन्वेषे।

विदूषकः—ब्राह्मणेन किं कार्यम्।

चेटी—किमन्यद्, भोजनार्थं निमन्त्रयितुम्।

विदूषकः—भवति, अहं कः, श्रमणकः।

चेटी—त्वं किलावैदिकः।

विदूषकः—कस्मादहमवैदिकः। शृणु तावत्। अस्ति रामायणं नाम नाट्यशास्त्रम्। तस्मिन् पञ्च श्लोका असम्पूर्णे संवत्सरे मया पठिताः।

चेटी—जानामि जानामि। आर्यस्य कुलोचित ईदृशो मेधाविभावः।

विदूषकः—न केवलं श्लोका एव, तेषामर्थोऽपि ज्ञातः। अपरो विशेषः, ब्राह्मणो दुर्लभोऽक्षरज्ञोऽर्थज्ञश्च।

चेटी—तेन हि भण, किं नामैतदक्षरम्। (नाममुद्रिकां दर्शयति)

विदूषकः (आत्मगतम्) अजानानः किं भणिष्यामि। एवं तावद् भणिष्यामि। (प्रकाशम्) भवति। एतदक्षरं मम पुस्तके नास्ति।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चेटी—यदि न जानासि, अदक्षिणं भुङ्क्ष्व ।

विदूषकः—भवतु, भवतु ।

चेटी—पश्यामि तावदार्यस्याङ्गुलीयकम् ।

विदूषकः—पश्य पश्य, मदीयं दर्शनीयम् ।

चेटी—(गृहीत्वा) एष भर्तृदारक इत एवागच्छति ।

विदूषकः—(परावृत्यावलोक्य च) कुत्र कुत्र तत्रभवान् ।

चेटी—विलोभितो मुग्धब्राह्मणः । इमं जनसमूहं प्रविश्य चतुष्पथमार्गेऽमुं वञ्चयित्वा गमिष्यामि । (निष्क्रान्ता)

विदूषकः—(सर्वतो विलोक्य) चन्द्रिके ! चन्द्रिके ! कुत्र कुत्र चन्द्रिका ! हा वञ्चितोऽस्मि । चौरदास्याः शीलं जानन्नप्यात्मनो भोजनविस्रम्भेण च्छलितोऽस्मि । भोजनमप्यलीकं चिन्तयामि । (अग्रतो विलोक्य) हन्तैषा धावति । तिष्ठ, तिष्ठ; अधर्मिष्ठदासि, तिष्ठ । किं धावत्येव । यावदहमपि धावामि । (धावति) मम पादौ स्वप्ने हस्तिनासाद्यमानस्येव तत्र तत्रैव पततः । हन्त, चौरदास्या वृत्तान्तं तत्रभवते निवेदयिष्यामि ।

—अविमारकनाटके भासः ।

अभ्यास

प्र. १. ' स्वजातिर्दुरतिक्रमा ' या धड्यांत वरचढ, श्रेष्ठ या अर्थाचे तुम्हांस दिसून येणारे सर्व शब्द सांगा.

प्र. २. वाक्यांत उपयोग करा :—

(अ) सहस्रधा या; निर्वेदं विनोदय्; हर्षोत्कर्षं प्रपद्; अभ्युपगम् ।

(ब) तेन हि, चित्रम्, ईदृश्, अतो नु खलु, किल, तावत्, उद्दिश्य ।

प्र. ३. पुढील वाक्यांचा प्रयोग बदला :—

गीतेन प्रीयते देवः ।

लक्ष्मण, वार्यतामियम् ।

गृह्यतामियं दुहिता ।

मुनिना [१]चिराहूतः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्र. ४. (अ) सूर्यात् मेघः कथं महत्तरः ।
(ब) पुरुषार्थाः कति सन्ति । तेषां नामानि लिखितव्यानि ।
(क) कीदृशो ब्राह्मणो दुर्लभः, कीदृशश्च सुलभः ।

प्र. ५. पुढील श्लोक पाठ म्हणून दाखवा :—
(अ) शशिना सह याति...
(ब) अनुचरति शशाङ्कं...
(क) वनेचरस्तृणाहारः...

१०.—शल्यसारथ्यस्वीकारः

परिचय :—द्रोणवधानंतर कौरवांच्या सेनेचें आधिपत्य कर्णाकडे द्यावयाचें होतें. त्यावेळीं शल्यानें आपलें सारथ्य केलें, तरच आपण अर्जुनास जिंकूं शकूं, असें कर्ण दुर्योधनास म्हणतो. त्या प्रसंगाची हकीकत या उताऱ्यांत सांगितली आहे. शल्य हा राजा होता, व कर्ण हा लोकसमजुतीप्रमाणें सारथ्याचा मुलगा होता. तेव्हां त्या हीन कुळांतल्या मनुष्याचें सारथ्य करणें शल्यास कमीपणाचें वाटलें. परंतु मोठा युक्तिवाद लढवून कशा चतुराईनें दुर्योधन शल्यास प्रसन्न करून घेतो, हें पहाण्यासारखें आहे.

अथ प्रभाते संनद्धे संनिकृष्टे बलद्वये
ऊचे दुर्योधनं कर्णः पाण्डुसेनां विलोकयन् ॥ १ ॥
अद्य गाण्डीवधन्वानं हत्वा सारं भवद्द्विषाम्
सफलं ते करोम्येष संकल्पं चिरसंभृतम् ॥ २ ॥
निन्द्यं सर्वात्मना लोके सतां स्वगुणकीर्तनम्
किं तु कर्तव्यकालेषु न प्रशंसन्ति मूकताम् ॥ ३ ॥
अहमभ्यधिकः पार्थाद्विद्यया विक्रमेण च
एतावदधिकं कृष्णो यदनर्घोऽस्य सारथिः ॥ ४ ॥
कृष्णादभ्यधिकः शल्यो विदितः सर्वभूभुजाम्
तेन सारथिना जिष्णुं विजेतुमहमुत्सहे ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इति वैकर्तनेनोक्ते हृष्टो राजा सुयोधनः
तदैवाभ्येत्य विनयान्मद्रराजमभाषत ॥ ६ ॥
ततो मद्राधिपः क्रुद्धः संरम्भलुलितांशुकः
सासूयं वीक्ष्य राधेयं कौरवाधिपमभ्यधात् ॥ ७ ॥
अहो सरलता राजन्नवमानाय केवलम्
यदहं दीर्घसंबाभ्यां सारथ्ये गदितस्त्वया ॥ ८ ॥
किमहं पाण्डवान्सर्वान् हन्तुं शक्तो न संगरे
नृपं मां सूतपुत्रस्य सूतं कर्तुं यदिच्छसि ॥ ९ ॥
उक्त्वेति सहसा शल्ये सानुगे हन्तुमुद्यते
प्रसाद्य तं कुरुपतिर्वक्तुं समुपचक्रमे ॥ १० ॥
मद्रराज न संरम्भमस्थाने कर्तुमर्हसि
अधिकस्त्वं हि गोविन्दादतोऽस्माभिरिहार्थ्यसे ॥ ११ ॥
अर्जुनादधिकः कृष्णः सारथिर्विहितः परैः
त्वं कर्णादधिकस्तस्मात्सारथ्ये मा हठं कृथाः ॥ १२ ॥
ऐश्वर्यस्याभिजन्यस्य गुणानां विक्रमस्य च
सन्तः फलं हि मन्यन्ते मित्रप्रणयपूरणम् ॥ १३ ॥
उक्ते दुर्योधनेनेति मद्रराजः स्मिताननः
स्वच्छन्दवादी सूतोऽहं भविष्यामीत्यभाषत ॥ १४ ॥

—भारतमञ्जर्यां क्षेमेन्द्रः ।

११.—आपत्सु मित्रं जानीयात्

अस्ति मगधदेशे चंपकवती नामारण्यानी । तस्यां चिरान् महता स्नेहेन मृगकाकौ निवसतः । स च मृगः स्वेच्छया भ्राम्यन् हृष्टपुष्टांगः केनचिच्छृगालेनावलोकितः । तं दृष्ट्वा शृगालोऽचिन्तयत् । आः, कथमेतन्मांसं सुललितं भक्षयामि । भवतु । विश्वासं तावदुत्पादयामि । इत्यालोच्योपसृत्याब्रवीत्—मित्र, कुशलं ते ? मृगेणोक्तम्—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कस्त्वम् ? स ब्रूते । क्षुद्रबुद्धिनामा जम्बुकोऽहम् । अत्रारण्ये बन्धुहीनो मृतवन्निवसामि । इदानीं त्वां मित्रमासाद्य पुनः सबन्धुर्जीवलोकं प्रविष्टोऽस्मि । अधुना तवानुचरेण मया सर्वथा भवितव्यम् । मृगेणोक्तम्—एवमस्तु । ततः पश्चादस्तंगते सवितरि तौ मृगस्य वासभूमिं गतौ । तत्र चंपकवृक्षशाखायां सुबुद्धिनामा काको मृगस्य चिरमित्रं निवसति । तौ दृष्ट्वा काकोऽवदत् । सखे चित्राङ्ग, कोऽयं द्वितीयः । मृगो ब्रूते । जम्बुकोऽयम् । अस्मत्सख्यमिच्छन्नागतः । काको ब्रूते—मित्र, अकस्मादागन्तुना सह मैत्री न युक्ता । तथा चोक्तम्—

अज्ञातकुलशीलस्य वासो देयो न कस्यचित् ।

तदाकर्ण्य जम्बुकः सकोपमाह—मृगस्य प्रथमदर्शनदिने भवानप्यज्ञातकुलशील एव; तत्कथं भवता सहैतस्य स्नेहानुवृत्तिरुत्तरोत्तरं वर्धते ।

यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि
निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ॥

अन्यच्च ।

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥

अपि च ।

तृणानि भूमिरुदकं वाक् चतुर्थी च सूनृता
एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यन्ते कदाचन ॥

शृणु पुनः ।

स्वच्छन्दवनजातेन शाकेनापि प्रपूर्यते
अस्य दग्धोदरस्यार्थे कः कुर्यात् पातकं महत् ॥

यथाऽयं मृगो मम बन्धुस्तथा भवानपि । मृगोऽब्रवीत्—किमनेनोत्तरोत्तरेण ? सर्वैरेकत्र विश्रम्भालापैः सुखिभिः स्थीयताम् । यतः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न कश्चित्कस्यचिन्मित्रं न कश्चित्कस्यचिद्रिपुः
व्यवहारेण जायन्ते मित्राणि रिपवस्तथा ॥

काकेनोक्तम् । एवमस्तु । अथ प्रातः सर्वे यथाभिमतदेशं गताः । एकदा निभृतं शृगालो ब्रूते–सखे अस्मिन्वनैकदेशे सस्यपूर्णं क्षेत्रमस्ति । तदहं त्वां नीत्वा दर्शयामि । तथा कृते सति स मृगः प्रत्यहं तत्र गत्वा सस्यं खादति । अथ क्षेत्रपतिना तद्दृष्ट्वा पाशो नियोजितः । अनन्तरं पुनरागतो मृगः पाशैर्बद्धोऽचिन्तयत् । को मामितः कालपाशादिव व्याधपाशात्त्रातुं मित्रादन्यः समर्थः । तत्रान्तरे जम्बुकस्तत्रागत्योपस्थितोऽचिन्तयत् । फलिता तावदस्माकं कपटप्रबन्धेन मनोरथसिद्धिः । एतस्योत्कृत्यमानस्य मांसासृग्लिप्तान्यस्थीनि मयाऽवश्यं प्राप्तव्यानि । तानि बाहुल्येन भोजनानि भविष्यन्ति । मृगस्तं दृष्ट्वोल्लसितो ब्रूते । सखे, छिन्धि तावन्मम बन्धनम् । सत्वरं त्रायस्व माम् । यतः—

आपत्सु मित्रं जानीयाद्युद्धे शूरमृणे शुचिम्
भार्यां क्षीणेषु वित्तेषु व्यसनेषु च बान्धवान् ।

अपरं च ।

उत्सवे व्यसने चैव दुर्भिक्षे राष्ट्रविप्लवे
राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ।

जम्बुको मुहुर्मुहुः पाशं विलोक्याचिन्तयत्–दृढस्तावदयं बन्धः । ब्रूते च–सखे, स्नायुनिर्मिता एते पाशाः; तदद्य भट्टारकवारे कथमेतान्दन्तैः स्पृशामि । मित्र यदि चित्ते नान्यथा मन्यसे तदा प्रभाते यत्त्वया वक्तव्यं तत्कर्तव्यम् । इत्युक्त्वा तत्समीप आच्छाद्यमानः स्थितः । अनन्तरं स काकः प्रदोषकाले मृगमनागतमवलोक्येतस्ततोऽन्विष्य तथाविधं दृष्ट्वोवाच–सखे, किमेतत् । मृगेणोक्तम्–अवधीरितसुहृद्वाक्यस्य फलमेतत् । काको ब्रूते–स वञ्चकः क्वास्ते । मृगेणोक्तम्–मन्मांसार्थी तिष्ठत्येव । ततः काको दीर्घं निःश्वस्य ब्रूते–अरे वञ्चक, किं त्वया पापकर्मणा कृतम् । यतः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुर्जनेन समं वैरं प्रीतिं चापि न कारयेत्
उष्णो दहति चाङ्गारः शीतः कृष्णायते करम् ॥

अपि च ।

दुर्जनः प्रियवादी च नैतद्विश्वासकारणम्
मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदि हालाहलं विषम् ॥

अथ प्रभाते क्षेत्रपतिर्लगुडहस्तस्तं प्रदेशमागच्छन् काकेनावलोकितः । तमालोक्य काकेनोक्तम्—सखे मृग, त्वमात्मानं मृतवत्संदर्श्य वातेनोदरं पूरयित्वा पादान्स्तब्धीकृत्य तिष्ठ । यदाऽहं शब्दं करोमि तदा त्वमुत्थाय सत्वरं पलायिष्यसे । मृगस्तथैव काकवचनेन स्थितः । ततः क्षेत्रपतिना हर्षोत्फुल्ललोचनेन तथाविधो मृग आलोकितः । 'आः, स्वयं मृतोऽसि' इत्युक्त्वा बन्धनान्मोचयित्वा पाशान्ग्रहीतुं सयत्नो बभूव । ततः काकशब्दं श्रुत्वा मृगः सत्वरमुत्थाय पलायितः । तमुद्दिश्य तेन क्षेत्रपतिना क्षिप्तेन लगुडेन शृगालो हतः । तथा चोक्तम् ।

त्रिभिर्वर्षैस्त्रिभिर्मासैस्त्रिभिः पक्षैस्त्रिभिर्दिनैः
अत्युत्कटैः पापपुण्यैरिहैव फलमश्नुते ॥

अतोऽहं ब्रवीमि—

भक्ष्यभक्षकयोः प्रीतिर्विपत्तेरेव कारणम्
शृगालात्पाशबद्धोऽसौ मृगः काकेन रक्षितः ॥

—हितोपदेशः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२.—सूक्तिसुधातुषाराः

द्वितीयो निस्यन्दः

निवडक सुभाषितांतील सौन्दर्याचा आस्वाद घेत असतांना कांहीं संस्कृत कवींच्या—विशेषतः कविकुलगुरु कालिदासाच्या—ग्रंथांचीं नांवें मुलांस माहीत व्हावींत, अशी योजना या धड्यांत केली आहे. पहिल्या श्लोकांत ज्या क्रमानें कवींचीं नांवें गुंफिलीं गेलीं आहेत, त्याच क्रमानें ते ते कवि घेऊन त्यांचीं निवडक वचनें देण्यांत आलीं आहेत, हें सांगावयास नकोच.

यस्याश्चोरश्चिकुरनिकरः, कर्णपूरो मयूरो
भासो हासः, कविकुलगुरुः, कालिदासो विलासः ।
हर्षो हर्षो, हृदयवसतिः पञ्चबाणस्तु बाणः
केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय ॥

—प्रसन्नराघवे जयदेवः ।

भूयासुर्भासयन्तो भुवनमभिनवा भानवो भानवीयाः ।

—सूर्यप्रशस्तौ मयूरः ।

प्रियनिवेद्यमानानि प्रियाणि प्रियतराणि भवन्ति ।
न हि घृतवचनेन पित्तं नश्यति ।

—अविमारके भासः ।

कालक्रमेण जगतः परिवर्तमाना
चक्रारपङ्क्तिरिव गच्छति भाग्यपङ्क्तिः ॥

—स्वप्नवासवदत्ते भासः ।

एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः ॥
विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः ॥
न केवलं यो महतोऽपभाषते शृणोति तस्मादपि यः स पापभाक् ॥

—कुमारसंभवे कालिदासः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ॥
आपन्नार्तिप्रशमनफलाः सम्पदो ह्युत्तमानाम् ॥

—मेघदूते कालिदासः ।

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ।
न हि प्रफुल्लं सहकारमेत्य वृक्षान्तरं काङ्क्षति षट्पदाली ।
अभितप्तमयोऽपि मार्दवं भजते, कैव कथा शरीरिषु ।

—रघुवंशे कालिदासः ।

पात्रविशेषे न्यस्तं गुणान्तरं व्रजति शिल्पमाधातुः
जलमिव समुद्रशुक्तौ मुक्ताफलतां पयोदस्य ॥

—मालविकाग्निमित्रे कालिदासः ।

स्वार्थात्सतां गुरुतरा प्रणयिक्रियैव ।
अथवा चन्द्रादमृतमिति किमत्राश्चर्यम् ।

—विक्रमोर्वशीये कालिदासः ।

न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् ।
स्निग्धजनसंविभक्तं खलु दुःखं सह्यवेदनं भवति ।

—अभिज्ञानशाकुन्तले कालिदासः ।

अपां हि तृप्ताय न वारिधारा स्वादुः सुगन्धिः स्वदते तुषारा ॥
ब्रुवते हि फलेन साधवो न तु कण्ठेन निजोपयोगिताम् ॥

—नैषधीयचरिते श्रीहर्षः ।

प्रबलपङ्क इव सर्वमधस्तान्नयति दारुणो दासशब्दः ।
प्रतनुगुणग्राह्याणि कुसुमानीव हि भवन्ति सतां मनांसि ।
अलोहः खलु संयमनपाशः सौजन्यमभिजातानाम् ।

—हर्षचरिते बाणः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आवेदयन्ति हि प्रत्यासन्नमानन्दमग्रपातीनि शुभानि निमित्तानि ।
प्राणपरित्यागेनापि रक्षणीयाः सुहृदसवः ।

कटु क्वणन्तो मलदायकाः खला—
स्तुदन्त्यलं बन्धनशृङ्खला इव ॥

मनस्तु साधुध्वनिभिः पदे पदे
हरन्ति सन्तो मणिनूपुरा इव ॥

—कादम्बर्यां बाणः ।

१३.—नारदगर्वपरिहारः

एखादें तत्त्व पटवून द्यावयाचें असल्यास तें अगदीं गंभीर चेहेऱ्यानेंच पटवून दिलें पाहिजे असें नाहीं, तर विनोदाच्या द्वारेंहि तें कार्य तितकेंच, किंबहुना अधिक चांगल्या रीतीनें साधतां येतें, याचें खालील गोष्ट हें उत्तम उदाहरण आहे. आजकालच्या दिवसांत "संसारांतील अनेक व्याप व अडचणी मागें लागल्या असतांहि त्यांतूनहि सांपडेल तेवढ्या वेळांत आपल्या ध्येयास वाहून घेणें हीच खरी ध्येयनिष्ठा होय" असें खालील उताऱ्याचें सार काढल्यास फारशी चूक होणार नाहीं.

कदाचिन्नारदो भगवन्तं श्रीवासुदेवमुपेत्य पप्रच्छ । "भगवन् को वा भवतः परमः प्रेमास्पदं च भक्तः" इति । भगवांस्तु तन्नारदस्य वचनमाकर्ण्य नूनमयमात्मानमेव मे परमं भक्तं मन्वान इदानीमवलेपमावहतीति निश्चिन्वानः प्राह । "वत्स, विद्यते स एको मे परमप्रियो भक्तः, य एव मामेकान्ततः प्रीणयति । यदि तु कामयसे तं द्रष्टुं तदा गत्वा भूवलयं कृतार्थीकुरुष्व चक्षुरात्मीयम् । तत्र च विदिशायां नाम नगर्यां निवसति कृषीवलोत्तंसो भद्रदत्त इति । स एव च स इत्यवगच्छ" इति । नारदस्तु तच्छ्रुत्वा विस्मिततमो भूमण्डलं प्रतस्थे । गत्वा च विदिशां प्रत्यक्षीचकार भगवता निर्दिष्टं पुरुषम् । स किल प्रतिप्रभातं शुचौ देशे समासीनः प्रेमभरमन्थरेण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

6684
92
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
20963

चेतसा क्षणमात्रं भगवन्तं स्मरति प्रणमति च। ततश्च कृषिकर्मणि व्याप्रियते न तु पुनर्भगवन्तं स्मरति। तमवलोकमानस्तु नारदः "अहो किमत्र प्रत्यक्षीकर्तव्यं, का चात्र भक्तिर्नाम, अहो परिहासशीलता भगवतो वासुदेवस्य" इति स्वगतमेव वदन् वैकुण्ठं प्राप। तं च प्रत्यागतमवलोक्य भगवान्प्राह। "वत्स नारद, अपि गतवानसि भूवलयं, कच्चित्प्रत्यक्षीकृतस्त्वया स भद्रदत्तो नाम मे प्रियतमो भक्तः" इति। नारदस्तु प्रत्यवदत्। "भगवन्दृष्टो मया भवन्निर्दिष्टो भक्तः, नैव तु कश्चित्तत्र विशेष उपलब्धः" इति। अथाकथयच्च तत्र प्रत्यक्षीकृतं वृत्तान्तम्। तन्निशम्य जलपरिपूरितमेकं पात्रमादाय भगवान्नारदमब्रूत "भद्र, गृहीत्वैतत्त्रिः प्रदक्षिणीकुरु पुरोवर्त्यैतदायतनम्। तथा पुनरवधीयतां, यथा नैकोऽपि जलबिन्दुः पात्रादधस्तात्स्खलिष्यति"। इति। नारदोऽपि तदाकर्ण्य "यथाज्ञापयति भगवान्" इत्यभिधाय गृहीतपात्रो बिन्दुस्खलनभीत्या तदेकतानमना आयतनं परितस्त्रिर्बभ्राम। प्रत्यागतं च तं श्रीभगवानगदत्। "वत्स! अपि प्रदक्षिणीकृतं भवतायतनम्" इति।

नारदः—"अथ किम्"

भगवान्—"तद् ब्रूहि प्रदक्षिणीकुर्वता भवता कतिवारं स्मृतोऽहमिति"।

नारदः—"भगवन्, यत्सत्यं नैकदाऽप्यहं भवन्तमस्मरम्"।

भगवान्:—(विहस्य) "वत्स, यदि क्षुद्रतमेऽपि कर्मणि व्यापृतेन भवताऽहं न स्मर्ये, तदा कथं वा नानाविधैः संसारक्लेशैः संत्रस्यद्भिर्दिवानिशं तेषु तेषु कर्मस्वासक्तैः स्मरणीयोऽहम्। तद्ब्रवीतु तावद्भवानेव, यद्येवं सति यः पुरुष एकाग्रेण चेतसा नियतकालं मां स्मरति, स किं मया भक्तोत्तमेषु गणनीय आहोस्विन्नेति।"

तदाकर्ण्य नारदः सलज्जमधोमुखोऽतिष्ठत्। इति शिवम्।

—संस्कृतचन्द्रिकायाम्।

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४.—मुहूर्तं मनोविनोदनम् [२]

या धड्यांतील विनोदपूर्ण व चुटकेवजा असलेल्या श्लोकांसारखे श्लोक संस्कृत-खेरीज इतर भाषांतून लिहिलेले आढळणें कठीण जाईल असें म्हणणें फारसें धाष्टर्याचें होणार नाहीं.

यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम्
स्वजनः श्वजनो मा भूत्सकलं शकलं सकृच्छकृत् ॥ १ ॥

कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति ।
अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥ २ ॥

दुन्दुभिस्तु नितरामचेतन—
स्तन्मुखादपि धनं धनं धनम् ।
इत्थमेव निनदन् प्रवर्तते
किं पुनर्यदि भवेत्सचेतनः ॥ ३ ॥

अशनं मे शयनं मे जाया मे बन्धुवर्गो मे ।
इति मेमे कुर्वाणं कालवृको हन्ति पुरुषाजम् ॥ ४ ॥

अपदो दूरगामी च साक्षरो नैव पण्डितः
अमुखः स्फुटवक्ता च यो जानाति स पण्डितः ॥ ५ ॥

पथ्ये सति गदार्तस्य भेषजग्रहणेन किम्
पथ्येऽसति गदार्तस्य भेषजग्रहणेन किम् ॥ ६ ॥

भट्टिर्नष्टो भारविश्चापि नष्टः
भिक्षुर्नष्टो भीमसेनोऽपि नष्टः ।
भुक्कुण्डोऽहं भूपतिस्त्वं च राजन्
संनिकृष्टे—(एकमेकांना येऊन) भिडलें असतांना.

बलद्वय—कौरव व पांडव या दोघांचें सैन्य.

गाण्डीवं धनुः यस्य सः। अर्जुन.

भवद्द्विषाम् सारम्=तुझ्या (भवतः) शत्रूंचें सार (सर्वोत्कृष्ट वीर असा जो अर्जुन).

चिरसंभृतं संकल्पम्—फारा दिवसांपासून बाळगलेला (तुझा) मनोरथ.

एतावद् अधिकम्—(मात्र अर्जुनाजवळ माझ्यापेक्षां) येवढेंच जास्त आहे—

यत्=कीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनर्घः=अमोल, मूल्यवान्. नास्ति अर्घो मूल्यं यस्य.

भूभुज्=राजा. भुवं भुनक्ति इति (उप० तत्पु०).

जिष्णु=अर्जुन. (जि+स्नु.) नेहमीं जिंकणारा, विजयशाली.

वैकर्तन=कर्ण. विकर्तनस्य (सूर्यस्य) अपत्यं पुमान् वैकर्तनः। कर्ण हा कुन्तीस सूर्यापासून झालेला मुलगा.

सुयोधन=दुर्योधन.

अभ्येत्य—अभि+आ+इ चें ल्यबन्त.

मद्राणां राजा=मद्रदेशाचा राजा. मद्रराजः=शल्यः।

अधिकं पाति रक्षति इति अधिपः।

संरम्भात् (मनःक्षोभामुळें) **लुलितानि** (फडफडत आहेत) **अंशुकानि** (वस्त्रें) **यस्य** (ज्याचीं) असा.

असूयया सह। (क्रि० वि०) मत्सरानें. (कर्णापेक्षां स्वतःस कमी लेखल्यामुळें कर्णाविषयीं मत्सर).

राधायाः अपत्यं पुमान् राधेयः—कर्णः। ज्या सारथ्यानें कर्णास लहानपणीं वाढविलें, त्याच्या बायकोचें नांव 'राधा' असें होतें.

अभ्यधात्—अभि+धा (बोलणें) चें तृ० भू० तृ० पु० ए० व०.

अहो सरलता......इ०—अशा तऱ्हेच्या अर्थाचें पुढील सुभाषित पहा:—

नात्यन्तं सरलं भाव्यं पश्य गत्वा मरुस्थलीम्।
छिद्यन्ते सरलास्तत्र कुब्जास्तिष्ठन्ति पादपाः॥

दीर्घसंघाभ्यां=(दीर्घ) बाहूंनीं ओंजळ करून; नमस्कार करून. 'संघ' या शब्दाचा 'जोडलेले हात' असा अर्थ. जरा ओढून ताणून घ्यावा लागतो. 'संघतल' याचा 'जोडलेले हात' असा अर्थ आपट्यांचे संस्कृत कोशांत सांपडतो.

नृपं माम् आणि **सूतपुत्रस्य** (कर्णस्य) **सूतम्** (सारथिम्) या दोहोंतील फरक लक्षांत घ्यावा. अशा तऱ्हेनें बोलून दुर्योधनाची विनंति किती अपमानकारक आहे, हें शल्यानें थोडक्या शब्दांत परिणामकारकपणें सुचविलें आहे.

सानुग—अनुयायांसह. **अनुगच्छतीति अनुगः। अनुगैः सह सानुगः।**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हन्तुम् उद्यते—(रागावून) पाण्डवांवर प्रहार करण्यास तयार झाला असतां.

प्रसाद्य=प्रसन्न करून. (प्र+सद् च्या प्रयोजकाचें ल्यबन्त).

अस्थाने—अस्थानीं, विनाकारण.

अस्माभिः इह (या बावतींत) **अर्थ्यसे** (विनंति केला जात आहेस)

परैः (शत्रुभिः) **विहितः** (कृतः)

मा हठं कृथाः—हट्ट धरूं नकोस. 'मा' या निषेधार्थी अव्ययाशीं धातूचें तृतीयभूतकाळी, प्रथमभूतकाळी किंवा आज्ञार्थी रूप वापरतात. अर्थ मात्र आज्ञार्थासारखा होतो. शिवाय 'मा' बरोबर वापरलें गेल्यास तृ० भू० व प्र० भू० च्या रूपांतील 'अ' चा लोप होतो. म्हणून मा अकृथाः=मा कृथाः=करूं नकोस.

आभिजन्य—अभिजनस्य भावः । **अभिजन**=कुल. **आभिजन्य**=कुलीनता.

प्रणय=विनंति.

फलं—पहिल्या ओळींत सांगितलेल्या गुणांचें फळ मित्राच्या विनंतीची पूर्तता करणें हेंच होय, असें सज्जन मानितात.

स्मितम् आनने यस्य—स्तुतीमुळें प्रसन्न झालेला, हा भावार्थ.

स्वच्छन्दं उदितुम् शीलम् अस्य इति । म्हणजे मी सारथि होईन, पण वाटेल तें बडबडणारा सारथी होईन. यामुळें मी कर्णाची हवी तशी निन्दा केली, तरी त्यानें मला उलट बोलतां कामा नये, अशी शल्यानें अट घातली.

---

११. आपत्सु मित्रं जानीयात् ।

"**आपत्सु...**" अशा प्रकारचेंच "Prosperity gains friends, but adversity tries them." हें बेकनचें वाक्य ध्यानांत ठेवावें.

अरण्यानी=महद् अरण्यम् । (अरण्य+आन+ई ⟶ तद्धित रूप.)

पुष्टानि अङ्गानि यस्य सः पुष्टाङ्गः । हृष्टः पुष्टाङ्गः च । (कर्मधारय स०)

सुललितं=लुसलुशीत.

आलोच्य=विचार करून.

आसाद्य=प्राप्य (मिळवून).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सबन्धुः=ज्याला बान्धव मिळाला आहे, असा.

जीवलोकं प्रविष्टः=' जगांत ' आलों आहें.

चिरात् मित्रम्=चिरमित्रम्.

आगन्तु=आ+गम्+तुन्=येणारा.

वासः=रहावयासाठीं जागा.

कस्यचित्=कस्मैचित्.

स्नेहस्य अनुवृत्तिः=मित्रत्वाचें वर्तन, नातें.

उत्तरोत्तरम् (क्रि० वि०) अधिकाधिक. (उत्तरस्माद् उत्तरम्)

निरस्ताः (तोडून टाकले आहेत) **पादपाः यस्मात् सः ।**

द्रुमायते=द्रुम इव आचरति=झाडासारखा होतो. (द्रुम+क्यङ्–नामधातु.)

तृणानि=तृणासन, बसावयास जागा.

सूनृता=नम्र.

न उच्छिद्यन्ते=नष्ट होत नाहींत, कमी पडत नाहींत.

प्रपूर्यते=भरलें जातें. (प्र+पृ चें कर्मणि तृ० पु० ए० व०).

दग्ध=क्षुद्र, क:पदार्थ असलेलें.

उत्तरोत्तरम्—उत्तरस्माद् उत्तरं यस्मिन् तद् भाषणम्=वादविवाद, उत्तर-प्रत्युत्तर असलेलें भाषण.

विश्रम्भ=विश्वास.

विश्रम्भालापैः=विश्रम्भम् आश्रितैः आलापैः (मध्यमपदलोपी स०) विश्वासाच्या, सुखदु:खाच्या गोष्टी बोलत; हितगुज करीत.

यथामितदेशम्—अभिमतः देशः अभिमतदेशः (कर्मधारय स०)। अभिमत-देशम् अनतिक्रम्य (अव्ययीभाव)=इष्ट ठिकाणीं.

निभृतं=गुप्तपणें, खासगी रीतीनें.

वनस्य एकदेशः=वनाचा एक भाग.

पाशो नियोजितः=जाळें वापरलें (पसरलें.)

तत्रान्तरे=तेवढ्या वेळांत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कपटः (कपटाचा) प्रबन्धः (डाव)

एतस्य उत्कृत्यमानस्य (उत् + कृत् – कृन्तति – चें कर्म. वर्त. वि.) हा कापला जात असतांना.

असृक् = रक्त.

बाहुल्येन = मोठ्या प्रमाणांत.

शुचि = प्रामाणिक.

राष्ट्रस्य विप्लवे (सङ्कटे).

भट्टारकवारः = रविवार.

चित्ते नान्यथा मन् = गैरसमज करून न घेणें.

आच्छाद्यमानः स्थितः = (वृक्ष इ० नीं) लपविला जाणारा असा बसला; लपून बसला.

प्रदोषस्य काले = संध्याकाळीं.

अवधीरितं (झिडकारलेलें) सुहृद्वाक्यम् । (कर्मधा.)

पापं कर्म यस्य स पापकर्मा ।

अङ्गार = कोळसा.

कृष्णायते = कृष्णं करोति ।

लगुडः (सोटा) हस्ते यस्य सः ।

संदर्श्य (सम् + दृश् – प्रयोजक.) दाखवून.

अस्तब्धान् स्तब्धान् कृत्वा = स्तब्धीकृत्य (च्वि रूप) = निश्चल करून.

पलायिष्यसे = पलाय् (आ० प०) चें भविष्य द्वि० पु० ए० व० 'पळून जाशील.'

मोचयित्वा = सोडवून (मुच् – प्रयो० ल्यबन्त)

तमुद्दिश्य = त्याच्यावर नेम धरून, त्याच्या रोखानें.

पक्ष = पंधरवडा.

अत्युत्कट—अतिशय.

त्रिभिर्वर्षैः......इ० यांमधील तीन या आंकड्याला विशेष असा अर्थ नसावा. पहिल्या ओळीचा साधारणपणें 'अगदीं थोड्याच अवधींत, ताबडतोब,' असा अर्थ घ्यावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. सूक्तिसुधातुषारा: (द्वितीयो निस्यन्द:)

चोर—एका कवीचें नांव.

चिकुर=केश.

कर्णपूर—कानांतील एक भूषण.

मयूर—' सूर्यप्रशस्ति ' या काव्याचा कर्ता.

हास:=मधुर स्मित.

विलास:=मनोहर लीला, रम्य आविष्कार.

हर्ष:—' नैषधीयचरित ' हें महाकाव्य रचणारा.

पञ्च बाणा: यस्य स पञ्चबाण: —**मदन:** ।

कविता एव कामिनी ।

सू०:—शेवटच्या ओळींतील अनुप्रास पहावा.

भानवीया: (भानो:) **अभिनवा:** (नूतना:, उदयकालीना:) **भानव:** (किरणा:) **भुवनं** (विश्वं) **भासयन्त:** (प्रकाशयन्त:) **भूयासु:** (भवेयु:) असा अन्वय घ्यावा.

प्रियै: (प्रियजनांकडून) **निवेद्यमानानि** (सांगितलीं जाणारीं)

प्रियाणि=सुवार्ता.

घृतवचनेन=" (केवळ) तूप (हा शब्द) उच्चारण्यानें. " यापेक्षां येथें ' घृत-वचनमात्रेण ' असा शब्दप्रयोग अधिक बरा दिसला असता.

चक्रस्य अरा: (आऱ्या) **तेषां पङ्क्ति:** ।

जगत: भाग्यपङ्क्ति: कालक्रमेण चक्रारपङ्क्तिरिव परिवर्तमाना गच्छति (बद-लत जाते) असा अन्वय घ्यावा. यावावत कालिदासाचें मेघदूतांतील खालील वचन पहा :—

कस्यात्यन्तं सुखमुपनतं दु:खमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥

भास हा कालिदासापूर्वी झाला असल्यामुळें कालिदासास ही कल्पना भासाच्या ओळींवरून सुचली असावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विकारहेतु = मोह पाडणारी किंवा (कोणताहि) विकार उत्पन्न करणारी वस्तु.

न विक्रियन्ते = विकारवश होत नाहींत.

संनिपात = समुदाय.

न केवलं... अपि = इतकेंच नव्हे,...तर (Not only...but also)

महतः = मोठ्या लोकांना.

पूर्णता गौरवाय = पूर्णता गौरवाला कारणीभूत होते.

आपन्नानां (दुःखितानां) आर्तिः (दुःखं) तस्याः प्रशमनं, तदेव फलं यासां ताः (सम्पदः).

श्यामिका = हिणकसपणा.

सहकार = आम्रवृक्ष.

अन्यः वृक्षः वृक्षान्तरम् ।

न हि प्रफुल्लं...इ० ओळींशीं तुलना म्हणून मङ्गलाचरणांतील 'स्थितोऽरविन्दे...' ही ओळ पहा.

अयः = लोखंड.

आधातुः = विधातुः ।

गुणान्तरं व्रजति = निराळाच गुण घेतें; अधिकच गुणवान्, सौंदर्यसंपन्न होतें.

यथा जलं मुक्ताफलतां व्रजति तथा हा भावार्थ.

प्रणयिषु क्रिया = याचकेभ्यः (इष्टस्य) दानम् ।

प्रभया तरलम् = तेजानें चंचल, तळपणारी.

स्निग्ध = प्रेमळ.

संविभक्त = विभागलेलें (असतां)

सह्यवेदनं = सह्या वेदना यस्य तत् ।

अपां तृप्ताय = अद्भिः (पाणी पिऊन) तृप्ताय ।

न स्वदते = न रोचते ।

तुषारा = शीतला

कण्ठेन = कण्ठानें, म्हणजे 'शब्दांनीं' असा अर्थ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रबल=दाट.

सर्वम्= सर्वांनाच, प्रत्येकाला.

अधस्तात् नयति=(१) खालीं नेतो; रुतवितो (२) अधोगतीला नेतो.

प्रतनुना गुणेन ग्राह्याणि=(१) वारीक दोऱ्यानेंहि ताव्यांत आणलीं— गोंवली—जाणारीं (२) लहानशा गुणानेंहि आकर्षिलीं जाणारीं.

अलोह=लोखंडाशिवाय बनलेला; ज्यांत लोखंड नाहीं, असा.

अभिजातानाम्=घरंदाज (थोर) लोकांचे बावतींत.

सौजन्यं संयमनपाशः (**अस्ति**) असा अन्वय घ्यावा.

आवेदयन्ति=सुचवितात.

प्रत्यासन्न=अगदीं जवळ येऊन ठेपलेला, आगामी.

अग्रे पतन्ति इति अग्रपातीनि । आधीं घडणारीं.

निमित्तानि=चिन्हें.

टीप:—जवळ जवळ अशाच अर्थाचें "Coming events cast their shadows before" असें आंग्लकवि **शेक्स्पिअर** याचें वचन आहे. मात्र हें वाक्य आगामी संकटाच्या सूचना दिसूं लागल्या, म्हणजे उद्धृत केलें जातें.

सुहृदः असवः=मित्रस्य प्राणाः ।

क्वणन्तः=(१) वडवडणारे, वटवट करणारे (खल); (२) खळखळणाऱ्या (बेड्या)

मलदायकाः=(१) कलंक लावणारे, (२) अंगावर वण उठवून अंग मलिन करणाऱ्या.

(**मनः**) **अलं तुदन्ति**=(मनाला) भरपूर पीडा देतात.

साधुध्वनिभिः=(१) गोड शब्दांनीं, (२) मंजुळ रुणझुणण्यांनीं.

पदे पदे=(१) प्रत्येक शब्दागणिक, (२) पावलोपावलीं.

मणिनूपुराः=मणिखचिताः नूपुराः (मध्यमपदलोपी स०) रत्नखचित पैंजण.

वि० सू०:—यांतील सर्वच सुभाषितें वेंचक असल्यानें मुलांनीं सगळींच पाठ करण्यासारखीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. नारदगर्वपरिहारः ।

प्रेम्णः आस्पदम् (स्थानम्)=प्रेमाचा विषय असलेला; आवडता (भक्त).

अवलेपम् आवहति=गर्व वाहतो.

निश्चिन्वान—निस् + चि याचें 'आन' प्रत्ययान्त वर्त० वि०

एकान्ततः=पूर्णपणें.

कामयसे=इच्छसि.

भुवः वलयं भूवलयम् । भूमण्डलावर.

कृतार्थीकुरुष्व इ०... =आपल्या डोळ्याचें पारणें फेड.

कृषीवलेषु उत्तंसः (अलंकारः) इव । (सप्तमी तत्पु०) शेतकऱ्यांमध्यें श्रेष्ठ.

स एव च स...इ० =तोच माझा प्रियभक्त होय, असें समज.

प्रेमभरेण मन्थरम्=प्रेमभरानें भारावलेलें.

व्याप्रियते (वि + आ + पृ चें कर्मणि)=निमग्न होतो.

अहो परिहासशीलता=काय हा (वासुदेवाचा) थट्टेखोर स्वभाव !

कच्चित् प्रत्यक्षीकृतः...इ० =(तूं त्याला) पाहिलेंस ना ? (ज्यावेळीं होकारार्थी उत्तर यावें अशी अपेक्षा असते, त्यावेळीं प्रश्नार्थक वाक्यांत 'कच्चित्'चा उपयोग करितात. अशी अपेक्षा नसल्यास 'किम्' वापरतात. उदा०—किम् कुशलं ते=तुझें बरें आहे का ? कच्चित्कुशलं ते=तुझें बरें आहे ना ?

नैव विशेषः उपलब्धः=(भक्तीचा) विशेष प्रकार मुळींच दिसला नाहीं.

तिः=तीन वेळां.

पुरोवर्ति=समोर असलेल्या.

तथा पुनः अवधीयताम्—आणि (तुझ्याकडून) अशी दक्षता घेतली जावी—

तदेकतानमनाः—तस्मिन् (पात्रे) एकतानं मनः यस्य सः ।

आयतनं परितः=घराभोंवतीं. 'परितः' हें अव्यय द्वितीया घेतें.

कतिवारं=किती वेळां.

यत्सत्य=खरें म्हटलें तर.

स्मर्यें—स्मृ चें कर्मणि प्र० पु० ए० व०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संत्रस्यद्भिः=पीड्यमानैः (जनैः)

दिवा च निशा च (समाहार द्वन्द्व) दिवानिशम्=रात्रंदिवस.

एवं सति=असें असतां.

नियतकालम्=ठराविक वेळीं. (नियतः कालः यस्मिन् कर्मणि तद् यथा स्यात् तथा)

इति शिवम्—लिखाण, भाषण, इ० च्या शेवटीं 'शुभं भवतु' या अर्थी 'इति शिवम्' असें मंगलवाचक विधान करण्याचा प्रघात आहे.

---

१४. मुहूर्तं मनोविनोदनम् ।

स्वजनः श्वजनः...स् च्या ऐवजीं श् असें चुकीनें लिहिलें जाऊन विपरीत अर्थ केला जाऊं नये, हा भावार्थ.

मा भूत्=मा भवतु. "**मा भूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः ।**" हें मेघदूतांतील वाक्य पहा.

अस्पृशन्नेव...इ०—याचकास पैसे देतांना देणाराला ते आपल्या हातानें द्यावे लागतात. पण हा कृपण इतका निरिच्छ, कीं पैसे दुसऱ्यास देतांना तो त्या पैशास स्पर्श करण्याचाहि लोभ दाखवीत नाहीं ! (मृत्यूनंतरच कृपणाचे पैसे दुसऱ्यास मिळणार. त्यावेळीं तो स्वतःच्या पैशांस हात कसा लावूं शकेल ? म्हणून कवीनें ही मजेदार कल्पना केली.)

धनम् धनम् धनम्–असा आवाज त्या दुन्दुभींतून निघतो. म्हणजे तो 'धन पाहिजे, धन पाहिजे' अशी ओरड करीत असतो, ही कविकल्पना.

मे मे कुर्वाणं=(१) माझें माझें करणाऱ्या (२) मे मे असा (बकऱ्यासारखा) आवाज काढणाऱ्या.

कालवृकः–कालः एव वृकः ।=काळ हाच कोणी लांडगा.

पुरुषः एव अजः (बोकड).

अपदो...इ०—हा एक उखाण्यासारखा प्रकार आहे. पाय नसून दूर तर जातो; अक्षरांनीं युक्त आहे पण पण्डित नाहीं; विनतोंडाचा असून स्पष्ट बोलणारा आहे; असा कोण ? उत्तर—पत्र !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पथ्ये सति—पथ्य असल्यावर (औषध आणखी काय करूं शकणार ?)

पथ्येऽसति=पथ्य नसल्यावर (कितीहि औषध घेतलें तरी काय उपयोग ?)

भट्टिर्नष्टो—यासंबंधींची दंतकथा साधारणपणें अशी आहे :—भुकुण्ड म्हणून एक निर्धन कवि होता. उपासमारीनें त्याचे प्राण कंठाशीं आले, म्हणून तो भोजराजाकडे गेला. 'भट्टिर्नष्टो...' हा त्यानें रचलेला श्लोक ऐकल्यावर भोजराजानें संतुष्ट होऊन त्यास पुष्कळ द्रव्य दिलें ! या श्लोकांत असें काय आहे, तें आपण पाहूं या.

भट्टि=एक व्याकरणकार कवि.

भारवि='किरातार्जुनीय' या महाकाव्याचा कर्ता.

भिक्षु=कोणीतरी एक बुद्ध भिक्षु.

भभा पङ्क्तौ...इ०—भभाच्या बाराखडीवर 'यमानें' (क्रमवार) हल्ला चालविला आहे. भीमसेनापर्यंतचे लोक त्यानें आतांपर्यंत मारले. आतां 'भी' नंतर 'भु' नें सुरू होणारें माझें नांव, म्हणून आतां भुकेनें मी मरत आहें; पण ध्यानांत ठेव, कीं मी मेलों, तर तुझें नांव 'भू' नें सुरू होणारें असल्यानें तो तुझ्यावरच पुढचा हल्ला करील. तेव्हां स्वतःचा जीव वांचवावयाचा असेल, तर आधीं माझ्या अन्नपाण्याची तरतूद कर !

राजंस्त्वत्...इ०—म्हणजे तुझा कीर्तिचन्द्र कधींच क्षीण होत नसल्यानें दररोज पौर्णिमाच वाटूं लागली आहे !

मद्गेहात्...इ० – बाहेर दररोज पौर्णिमा आहे, आणि आपण बाहेर पडलों, तर राजा आपणास शासन करील या भीतीनें एकादशी आमच्या घरांत जी दडून बसली आहे, ती बाहेर निघतच नाहीं ! या द्वारें कवीनें आपलें दारिद्र्य मोठ्या खुबीनें सुचविलें आहे.

सिताम्=शुभ्र.

विदूयते=दुःखित होतें. (वि+दु चें कर्मणि तृ० पु० ए० व०).

प्रियायाः अलकाली (केशपाश). आपल्या बायकोचे केस पांढरे होतील ही कवीला भीति पडली !

समुपास्यमान=सेविला जाणारा. (कर्मणि वर्त० वि०).

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिदशाधिपेन=देवराजेन इन्द्रेण. परंतु या शब्दावर कोटि करून कवीनें इन्द्र केवळ त्रिदश (म्हणजे तीस) लोकांचा स्वामी, असें म्हणून हजारों लोकांकडून सेविला जाणारा राजा इन्द्राहून कितीतरी श्रेष्ठ, असें सुचविलें आहे.

त्रिदश—तिस्रः दशाः येषां ते, असा विग्रह करणें सर्वोत्तम होय. (याला आधार-शिशुपाल वध, पहिल्या सर्गांतील ४६ व्या श्लोकावरील मल्लिनाथाची टीका पहा.) म्हणजे बाल्य, कौमार आणि यौवन या तीनच अवस्था ज्यांना आहेत, असे देव, असा त्रिदश शब्दाचा अर्थ होतो.

---

१५. हंसो हंसो बको बकः ।

संजातेर्ष्यः—संजाता ईर्ष्या यस्य सः । ज्याच्या मनांत ईर्ष्या उत्पन्न झाली आहे, असा.

अस्मदपेक्षया=आमच्याशीं तुलना करितां, आमच्यापेक्षां.

सलिलस्य आधारः=तडागः ।

प्रफुल्लैः कह्लारैः (श्वेतकमलैः) भासुरेषु (शोभमानेषु).

मृणाल=कमळाचा कन्द.

आत्मनः राजहंसतामेव प्रख्यापयामास=आपण राजहंसच आहोंत, असें लोकांस उघडपणें सांगूं लागला. (प्र+ख्या च्या प्रयोजकाचें द्वि० भू० तृ० पु० ए० व०)

उचित=स्वाभाविक. बकजातेः उचितम् (ष० त० समास)

मुग्धमति=अजाण.

भ्रान्तोऽसि=तुझा गैरसमज झाला.

अवादीत् (वद् चें तृ० भू० तृ० पु० ए० व०.)=अवदत् ।

त्वं सत्यं हंस एव...या वाक्यांतील उपरोध ध्यानांत आणावा.

सलिलेन मिश्रम् (तृ० त० समास)

बकहतक=दुष्ट बगळ्या !

कर्म एव कर्ममात्रं तस्य अनुकारेण अनुकरणेन।=केवळ कृतीचेंच अनुकरण केल्यानें.

किम् अश्वायेत—अश्व होईल का ? ('अश्व' पासून य प्रत्यय लागून 'अश्वा-सारखें होणें' या अर्थी बनलेल्या नामधातूचें विध्यर्थी तृ० पु० ए० व०)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विदितोऽसि—तुझें स्वरूप कळलें.

विवेके=भेद करण्याचे कामीं.

हंसः शुक्लः ...इ०—याच धर्तीवर असलेलें खालील सुभाषित ध्यानांत ठेवावें :—

> **काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः**
> **वसन्तसमये प्राप्ते काकः काकः पिकः पिकः ॥**

---

१६. रमणीयः कथायोगः ।

चक्र=समूह.

च्छेक=टीकाकार.

क्षिप्ते=अग्नौ क्षिप्ते.

स्वप्नवासवदत्त—भासाच्या सर्वोत्कृष्ट नाटकाचें नांव.

दिष्टया=बरें झालें (या अव्ययाचा उपयोग ध्यानांत ठेवावा.)

उपविष्टः=बसले; इकडे येतील ही भीति गेली.

प्रकृतिस्थशरीरः—प्रकृतौ तिष्ठतीति प्रकृतिस्थम् । प्रकृतिस्थम् (पूर्वीसारखें, नेहमीचें) शरीरं यस्य सः । आपल्या मृत्यूच्या बातमीनें राजा अत्यंत कृश झाला होता, असें वासवदत्तेच्या कानीं आलें होतें. राजवाडा सोडल्यानंतर राजास तिनें आज प्रथमच पाहिलें, त्यावेळीं तिला तो पूर्वीसारखाच झालेला दिसला. " दिष्ट्या "... इ. वाक्यांमध्यें वासवदत्तेचें प्रेम कसें एकदम उचंबळून आलेलें दिसतें, तें पहा.

भर्तृदारिके=राजकन्ये ! (पद्मावती !).

साश्रुपाता...यावरून वासवदत्तेच्या डोळ्यांस जुन्या आठवणींमुळें पाणी आलें असावें, हें उघड दिसतें.

अविनय=उच्छृंखलपणा.

रेणु=पराग. अर्थात् वेळ मारून नेण्यासाठीं वासवदत्तेनें हें कारण सांगितलें. नाहींतर, खरें सांगितलें असतें, तर रहस्यस्फोट झाला असता !

युज्यते—(हें कारण) योग्य दिसतें; असें असेलहि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमदवनम्=प्रमदाय (विहाराय) वनम् ।

प्रष्टव्यं...इ०—मला कांहीं विचारावयाचें आहे.

छन्दतः=खुशाल!

बहु मानं (प्रमाण) यस्य तद् बहुमानम् । फार मोठें (संकट). राजाच्या या वाक्यावरूनच विदूषकाच्या प्रश्नाचें उत्तर सूचित होतें. "मला पद्मावती अधिक आवडते" असें म्हणावयास राजास भीति वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. परंतु "मला वासवदत्ता अधिक आवडते" असें मनांतलें उत्तर देण्याचें राजा टाळीत आहे, याचें कारण तें उत्तर पद्मावतीच्या कानीं जाऊन ती रागावण्याची भीति होती.

यादृशे—हें वाक्य अपूर्ण आहे. "कोणत्या संकटांत सांपडले आहेत एवढे !" असा वाक्याचा अर्थ घ्यावा.

अहं च मन्दभागा !—सङ्कटे निक्षिप्ता अस्मि । हें अध्याहृत घ्यावें. ज्या वासवदत्तेनें राजासाठीं येवढें दिव्य केलें, तो राजा या प्रश्नाचें काय उत्तर देतो, याबद्दल वासवदत्तेस हुरहुर वाटणें किती साहजिक आहे !

स्वैरं=निर्भयपणें.

एका उपरता=एक मरण पावली आहे.

असंनिहिता=सध्यां जवळ नाहीं, लांब आहे.

मुखर=बोलका. म्हणजे "तुझ्या पोटांत कांहींहि राहात नाहीं; तूं कुठेंतरी बोलशील आणि पद्मावतीला कळेल," हा भावार्थ.

एतावता—"एवढ्या वाक्यानें राजानें काय सांगायचें तें सांगितलें." (राजाचें हृद्गत ओळखण्याचा चाणाक्षपणा पद्मावतीनें दाखविला.)

शपामि=शपथ घेऊन सांगतों.

कस्यापि=कस्मै अपि.

संदष्टा=चावली.

पुरोभागिता=हेकेखोरपणा.

मम='मला' असा अर्थ घ्यावा.

रुद्ध=(माझ्याकडून) अडविला गेला आहेस. तुला मी जाऊं देणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्=होय.

तेन हि=तर मग.

पश्यामः=पाहूंच या (कसा जाऊं देत नाहींस तें).

वयस्यभावेन शापितोऽसि=माझ्या स्नेहाची तुला शपथ आहे.

न हरति=(पद्मावती वासवदत्तेपासून) ओढून घेऊं शकत नाहीं.

अस्य परिखेदस्य=या (मी आतांपर्यंत साहिलेल्या) कष्टांचें.

बहुगुणः=पुष्कळ फायदेशीर. (कारण त्यामुळेंच राजाचें खरें खरें हृदय समजूं शकलें !) वासवदत्तेला यावेळीं इतकें समाधान वाटणें अगदीं स्वाभाविक नाहीं का ?

अदाक्षिण्यः=निष्ठुर. चेटीला आपल्या मालकिणीचें अशा तऱ्हेनें सांत्वन करणें प्राप्तच होतें !

सदाक्षिण्यः=प्रेमळ. पद्मावतीच्या या वाक्यावरून तिच्या मनाचा केवढा मोठेपणा दिसून येतो ! नाहींतर सामान्य स्त्रीला "निष्ठुर नाहींतर काय ! मी यांचं कुठं कमी करतें कुणास माहीत !" असेंच वाटलें असतें.

अभिजनस्य सदृशं मन्त्रितम्—वासवदत्तेलाहि तिच्या मनाचा मोठेपणा तत्काळ जाणवला, व म्हणूनच ती लगेच म्हणते, "आपल्या उच्च कुळाला साजेसाच विचार तुझ्या मनांत आला." अशीं एकामागून एक वाक्यें घालून भासानें स्वभाव-परिपोष किती कुशलतेनें केला आहे पहा !

भवान् इदानीं कथयतु—अर्थात् राजा हें गमतीनेंच म्हणत आहे.

वसन्तकः संवृत्तः—"हेही वसन्तका(विदूषकाचें नांव)सारखेच साधे, पोरकट बनले कीं !"

विप्रलपित=(निरर्थक) वडवड.

माम्—'माझें म्हणणें,' असा बोलण्याचा आशय.

महाब्राह्मणः—या शब्दांतील, तसेंच यापूर्वीच्या २।४ वाक्यांतील विनोद किती सहजसुंदर आहे बरें ?

अकोपना=न रागावणारी, शांत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अयं च अपरः ...या वाक्याचे प्रारंभीं "वासवदत्तायाम्" हा शब्द अध्याहृत घ्यावा.

प्रत्युद्गच्छति = मला पाहण्यासाठीं–शोधण्यासाठीं–येते.

टीप :—संस्कृत वाङ्मयांतील साऱ्याच विदूषकांमध्यें भोजनप्रियता विशेष प्रमाणांत असलेली आढळून येते. (धडा ९ पहा).

स्मर इदानीम् एताम्—आतां कर वासवदत्तेची आठवण ! विदूषकाच्या उत्तरानेंहि वासदवत्तेला समाधान वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

सर्वमेतत् कथयिष्ये...इ०—वरील सर्व प्रसंगांमुळें राजा देहभान विसरला. आपण वासवदत्तेच्या मृत्यूपूर्वीच्याच स्थितींत आहोंत, असा त्यास भास झाला. म्हणूनच त्याच्या तोंडून हें वाक्य बाहेर पडलें.

अविधा = अरेरे !

व्याक्षिप्तं = दुसरीकडे गुंतविलें गेलें.

ततः = म्हणून.

पूर्वाभ्यासेन निस्सृता = पूर्वीच्या संवयीमुळें बाहेर पडली.

टीप :—या सारखेंच 'विक्रमोर्वशीय' नाटकांतील—'तस्याः पुरुषोत्तम (पुरुषोत्तमे) इति भणितव्ये पुरूरवसीति ('पुरूरवसि' इति) निर्गता वाणी...' हें वाक्य पहा.

नृशंसेन = दुष्ट (विदूषकानें).

विसंवादितः = बिघडवून टाकला. भाषासौंदर्याच्या दृष्टीनें हें वाक्य ध्यानांत ठेवावें. शिवाय या वाक्यावरूनहि राजा व विदूषक यांच्या वरील संवादामुळें पद्मावतीला यत्किंचितही मत्सर न वाटतां उलट किती गोडी वाटत होती, हें दिसतें.

अहो प्रियं नाम = ही केवढी आनंदाची गोष्ट आहे कीं– ('नाम' चा उपयोग ध्यानांत ठेवावा.)

धारयतु = शांत व्हावें, धीर धरावा.

अवस्थाम् = माझ्या मनाची काय अवस्था झाली आहे, ती.

दुःखं = कठीण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यात्रा त्वेषा...इ०—मृत माणसाची आठवण केल्यानें जर अधिकच दुःख होत असलें, तर मग आठवण कराच कशाला? याचें उत्तर शेवटच्या दोन ओळींत सांगितलें आहे.

यात्रा त्वेषा=वस्तुस्थिति, व्यवहार मात्र असा आहे, कीं—

विसुच्य=विमुच्य एव.

प्राप्तानृण्या—ऋण म्हणजे कर्ज. नास्ति ऋणं यस्य सः अनृणः=कर्जमुक्त. **आनृण्य**=कर्जमुक्तता. प्राप्तम् आनृण्यम् यया सा प्राप्तानृण्या=कर्जमुक्त झालेली (बुद्धि.) म्हणजे अश्रूंच्या रूपानें दिवंगत माणसाचें ऋण देऊन टाकल्यावरच मन निर्मळ, हलकें होतें, एरवीं होत नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे (व म्हणूनच दुःख होत असतांहि आपण प्रियजनांची वारंवार आठवण करतों.)

---

१७. विश्वासो नैव...

विजानता=जाणत्या माणसानें. (वि+ज्ञा चें वर्त० विशेषण).

संपन्नः—या शब्दापुढें 'सन् अपि' हे दोन शब्द अध्याहृत घ्यावेत.

पार्थिवः=(शहाजी) राजा.

अविश्वास्यतरे=विश्वास ठेवण्यास अगदींच अपात्र, अशा.

तस्मिन्=मुस्तुफाखानें.

अविज्ञाता इङ्गितस्य गतिः यस्य सः। ज्याच्या मनोगताचा ठाव लागत नाहीं असा; आंतल्या गांठीचा. इङ्गित म्हणजे मनांतला आशय ("इङ्गितं हृद्गतो भावः")

श्रितः येदिलस्य (अदिलशहाच्या) **शासनम् आज्ञाम्**। अदिलशहाच्या आज्ञेवर-हुकूम वागणारा. म्हणजे त्यानें शहाजीला बादशहाच्या आज्ञेनें पकडलें, हा सांगणाराचा उद्देश.

हरिणाक्ष्या=सीतया.

प्रणोदितः=प्रेरितः (प्र+नुद् च्या प्रयो० चें कर्म. भू. धा. वि.)

राजधर्मः सलक्षणः=राजाचीं कर्तव्यें व त्यांचीं वैशिष्ट्यें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हालाहलस्य धरः सर्पः । तस्य आश्लेषः । सर्पास मिठी मारणें.

कालपन्नगचालनम् = कृष्णसर्पाला डिवचणें, हलविणें.

वैतृष्ण्यम् = तृष्णाशान्ति.

मृगतृष्णा = मृगजल.

यदि...तर्हि...म्हणजे खलसेवेनें कल्याण होणें, हें पहिल्या ओळींत सांगितलेल्या घटनेइतकेंच अशक्य, हा भावार्थ.

सुषिर = छिद्र; प्रहार करण्यायोग्य जागा. (weak point)

अहि-तः अपि (सर्पापेक्षांहि) अ-हितः (अहितकारक) ज्ञेयः (समजावा).

---

१८. सद्भृत्यलक्षणानि ।

संपत्तेः विपत्तौ = सुखाच्या काळापेक्षां विपत्काळीं.

समुन्नम्यमानाः = ते मानास चढविले जात असतांना (प्रयोजकाचें कर्म० वर्त० वि०)

अवनमन्ति = (विनयानें) खालीं मान घालतात.

समालापाः —समाः आलापाः येषां ते = बरोबरीनें उत्तरें देणारे.

न उत्सिच्यन्ते = (गर्वानें) चढून जात नाहींत.

क्षिप्यमाणाः —त्यांना टाकून बोललें असतां, हा भावार्थ.

न अपरागं गृह्णन्ति = द्वेषभाव बाळगीत नाहींत; मनाला लावून घेत नाहींत.

प्रतीपं = उलट.

हितप्रियं = हितकारक व गोड असेल तेंच (सांगतात.)

न विकत्थन्ते = बढाई मारीत नाहींत.

विकत्थमाना...इ०—(यदाकदाचित्) स्वतःचा मोठेपणा वर्णन करण्याची वेळ आलीच, तर तसें करतांना लाजतात.

आहवेषु = युद्धांमध्यें.

ध्वजभूताः = ध्वजा इव

दानकाले = (लोकांस) दान दिलें जात असतांना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठतो निलीयन्ते—(समाजाच्या) मागच्या बाजूस दडून बसतात. (बोलाविल्याविना पुढें येत नाहींत.)

जीवितात् पुरः=जगण्यापेक्षां.

परिचर्या=सेवा.

असन्तोष=अतृप्ति (म्हणजे त्यांची तृप्तिच होत नाहीं.)

व्यसन=नाद.

गुणग्रहणे=(स्वामीचे) गुणवर्णन करण्याचे कामीं.

कार्पण्य=कृपणपणा. धन्याचा त्याग न करण्याचे, (म्हणजे त्याचें सहवाससुख अखंड मिळवण्याचे) बावतींत कृपणपणा, हांव दाखवितात.

स्वस्मिन् अधीनाः स्वाधीनाः ।

अस्वाधीनाः सकलेन्द्रियवृत्तयो येषां ते–कोणत्याहि इन्द्रियाचे व्यापार त्या सेवकांच्या ताब्यांत नसल्यामुळें.

वाग्मिनः (वाक्+ग्मिन्)=वक्ते.

अनुपहत=अधू न झालेले, धडधाकट.

स्वामिचित्तम् एव आदर्शः दर्पणः, तस्मिन् ।

स्वामिचित्तादर्शे...इ०—म्हणजे धन्याच्या मनांत जे जे विचार येतील त्याप्रमाणें हुबेहूब आचरण करतात, हा भावार्थ.

---

१९. मुहूर्तं मनोविनोदनम् (३)

वासस्=वस्त्र, वेष.

प्रधानं=प्रधानं लक्षणम् ।

वासः प्रधानं खलु योग्यतायाः—याच अर्थाची इंग्रजीमधील "Apparel oft proclaims the man" ही म्हण ध्यानांत ठेवावी.

वाससा विहीनं वासोविहीनम् (तृ० त० स०)

पीतम् अम्बरं यस्य सः पीताम्बरः=विष्णुः ।

तनूजां=कन्याम्=लक्ष्मीम् ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिक् अम्बरं यस्य स दिगम्बरः = शङ्करः ।

विषम् = हालाहलम् ।

टीप :—समुद्रमन्थनाचे वेळीं निघालेल्या चौदा रत्नांपैकीं समुद्रानें लक्ष्मी विष्णूस दिली, व हालाहल शङ्करास दिलें.

हिमालये...इ०—पार्वती हिमालयाची मुलगी, म्हणून हिमालय शंकराचा सासरा होय. तसेंच लक्ष्मीचा पिता क्षीरसागर विष्णूचा सासरा होय. या समर्पक दृष्टान्तांमुळें विनोद निर्माण झाला आहे.

पञ्चमुखः = शंकर (त्याला पांच तोंडें आहेत अशी कल्पना).

षडानन = कार्तिकेय (षड् आननानि यस्य सः).

टीप :—शंकराच्या कुटुंबांतील प्रत्येकाची भूक पहावी, तों तोंडांच्या संख्येवरून किंवा आकारावरून अजमावितां येते. सम्पत्ति पहावी, तों 'दिगम्बर' या विशेषणावरून समजते. मग सर्वजण जिवंत कशीं राहिलीं? तर घरांत अन्न पुरविणारी पार्वती आहे म्हणून !

'**क्षुधार्तः शाम्भवः** (शम्भोः अयम् । शम्भु + अ = शंकराचा.) **फणी** (सर्पः). **गणपतेः आखुम् अत्तुं वाञ्छति** '–असा अन्वय.

तं = सर्पम्.

क्रौञ्चपति—क्रौञ्च पर्वतास छिद्र पाडून कार्तिकेयानें त्याजवर आपलें प्रभुत्व गाजविलें, म्हणून त्यास क्रौञ्चपति म्हणतात.

शिखी = मोर.

नागाननम् = गजाननम् । सिंह हत्तीस खातो. गजाननाचें तोंड हत्तीचें दिसल्यावर पार्वतीच्या सिंहाला तें खावेंसें वाटणारच !

असूयति = मत्सर करिते, कारण गंगा ही गौरीची सवत मानितात.

कलानाथः = चंद्र.

कपालानलः = **कपालस्थः अनलः** । **कपाल** = (पट्टीसारखें) सपाट हाड. यावरून 'कपाळाचें हाड' असा अर्थ घ्यावा. **कपालानलः** म्हणजे शंकराच्या कपाळावरील–तृतीय नेत्रांतील–अग्नि असा अर्थ घेतां येईल. शंकर हा चन्द्रास तिसऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डोळ्याच्या वरच्या बाजूस, म्हणजे जवळजवळ डोक्यापाशीं धारण करितो. तेव्हां एकतर आपणापेक्षां चन्द्रास उच्चस्थान मिळतें, व दुसरें, सौंदर्य व शीतलता यामुळें चन्द्र अधिक लोकप्रिय होतो, यावद्दल अग्नीस चन्द्राविषयीं मत्सर वाटत असला पाहिजे.

निर्विण्णः = दुःखी, वैतागलेला (निर् + विद् चें क० भू० धा० वि०)

टीप :—शंकराच्या घरांत सर्वजण एकमेकांना खायला उठले आहेत, अशी कवीनें कल्पना केली, व समुद्रमन्थनाचे वेळीं शंकरानें हालाहल प्राशन केल्याचें कारण कुटुम्बकलह हेंच असावें, असा तर्क बांधून विनोद उत्पन्न केला.

वाग्देवीं नर्तयामि—लोकांनीं कौतुक करून द्रव्य द्यावें, म्हणून (जसा दरवेशी वानरीला तसा) मी माझ्या वाङ्मयकृतीला घरोघर फिरवितों, हा भावार्थ.

प्रार्थयेत् इति = प्रार्थना, याचना करील म्हणून. प्रार्थ् धातु आत्मनेपदी असल्यानें प्रार्थयेत् हें परस्मैपदी रूप अ-**पाणिनीय** आहे.

तथाहि = कारण. येथून दुसरें वाक्य सुरू झालें. '**याचना**' पासून '**अखिलमेव**' पर्यंत एक वाक्य पुरें समजावें.

याचितुमिच्छन् भगवानपि विष्णुः सद्य एव वामनः भवति – याचनेची इच्छा मनांत येतांच भगवान् विष्णूसुद्धां तत्क्षणीं (सद्य एव) वामन (ठेंगणा) बनला असावा, अशी कवीची कल्पना.

बिडौजाः = इन्द्र.

पद्मं योनिः (जन्मस्थानं) यस्य सः = ब्रह्मदेव. (तो विष्णूच्या नाभिकमळांत जन्मला, म्हणून पद्मयोनि)

अवोचत् (वच् तृ० भू० तृ० पु० ए० व०) = उक्तवान्.

विरिञ्चिः = ब्रह्मदेव.

जलनिधौ—कारण समुद्रमन्थनाचे वेळीं समुद्रांतून (विष्णूचा) शंखहि निघाला होता.

मुरस्य रिपुः मुररिपुः = विष्णु.

स्थितिः = निवासः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुटिलता...इ०—वरील गुण असतांहि तुझ्या मनाची कुटिलता (कपट) गेली नाहीं. 'कुटिलता' याचा दुसरा अर्थ 'शंखाच्या पोटांतला वक्रपणा' हा होय. तो गेला नाहीं, ही वस्तुस्थिति, व 'कपट' गेलें नाहीं, ही कविकल्पना होय.

सरसि रोहति इति सरोरुहं=कमलम् ।

कुपिता—कारण सरस्वती व लक्ष्मी या दोन स्त्रिया राजाजवळ पाहिल्यावर कीर्तीला सवतीमत्सर वाटूं लागला.

देशान्तरं गता=दूर देशाला निघून गेली. म्हणजे तुझी कीर्ति इतरत्र पसरली, हें भाटानें राजाला मोठ्या खुबीनें सांगितलें आहे.

चोरः—नारायणास चोर म्हणण्याचें कारण पुढच्या ओळींत सांगितलें आहे. 'आम्ही अनेक जन्म कावाडकष्ट करून मिळविलेला पापाचा सांठा त्याची आठवण केल्याबरोबर तो चोरून नेतो !' **अनेकेषु जन्मसु अर्जितं पापसंचयम्** । अर्जित, संचय आणि हरति हे शब्द चोरीचे बाबतींत कसे उत्तम लागू पडतात पहा.

---

२०. आर्यचन्दनदासो वधस्तम्भं नीयते ।

कुटुम्बिनी=भार्या.

चारित्रभङ्गभीरु—(आयुष्यांत) आपल्या चारित्र्यास कसलाहि कलंक लागूं नये, म्हणून जपणारे.

चोरजन—म्हणजे केवळ चोरच असें नाहीं, तर सर्वच गुन्हेगार लोक.

कृतान्त=दैव.

न...उदासीनेषु...इ०—निरपराधी आणि अपराधी यांमध्यें क्रूरांना कांहींच भेद दिसत नाहीं.

आमिषाणि=(१) मांस (२) लोभ उत्पन्न करणारे विषय.

को नाम निर्बन्धः=काय म्हणून अट्टाहास असावा बरें ?

विष्णुदास=चन्दनदासाचा एक मित्र.

एतस्मिन् काले=या (संकटाच्या) काळीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्रुपातमात्रेण कृतप्रतीकाराः =(चन्दनदासावरील जुलुमाचा) प्रतिकार ज्यांनीं केवळ अश्रुपातानेंच केला आहे, असे.

स्वशरीरैः =(केवळ) शरीरानेंच, (मनानें नव्हे)

कथमपि = कसेबसे.

गुरुकया = जड झालेल्या.

विसर्जय = सोड, निरोप दे.

परलोकं प्रस्थितः...इ०—चन्दनदासाच्या भार्येच्या बोलण्याचा आशय असा : " सामान्य प्रसंग असता, तर मी या मर्यादेपुढें आलें नसतें; पण आपला कायमचा वियोग होण्याचा हा प्रसंग असल्यानें शक्य तोंवर आपल्याबरोबर येणें मला आवश्यक वाटतें. "

पुरुषदोषेण = माझ्या वैयक्तिक दोषामुळें.

व्यवसितम् = आरंभिलें आहे.

भर्तुश्चरणौ...इ०—सहगमन करून स्वतःचें कल्याण साधावें, म्हणून (मी सहगमनाची तयारी करीत आहें.)

अश्रुतलोकसंव्यवहारः = ज्याला अजून लोकव्यवहार माहीत झाला नाहीं असा.

अनुगृहीतव्यः—भावार्थ असा, कीं त्याच्यासाठीं तरी तूं जगावेंस.

टीप :—" अथ किं व्यवसितम् "...पासून " प्रसन्ना देवताः " पर्यंतचा भाग ७ व्या धड्यांतील रामसीतासंवादाची आठवण करून दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

पश्चिमयोः = ज्यांचें अखेरचेंच दर्शन होत आहे, अशा (पायांवर.)

चाणक्यविरहिते...इ०—या वाक्यांतील खोंच पहा.

निखातः = रोंवला आहे.

स्वर्गं गतानां...इ०—माझ्या मृत्यूनंतर देव तुमच्यावर दया करीलच, हा बोलणाराचा आशय.

किं हर्षस्थानेऽपि...इ०—(सत्कार्यासाठीं मी मरणार म्हणून) आनंद वाटण्याऐवजीं वाईट कां बरें वाटतें ?

स्वयमेव = आपण होऊनच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवश्यं भवितव्ये...इ०—हें सुंदर वाक्य ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. 'मरण केव्हांतरी येणारच, पण त्यांतल्या त्यांत मित्रकार्य साधीत असतां मला मृत्यु प्राप्त होत आहे, हें माझें मोठेंच भाग्य होय,' हा तात्पर्यार्थ.

कुलधर्मः खलु=हें आपल्या घराण्याचें पिढ्यान् पिढ्या चालत आलेलें ब्रीदच आहे.

सोरस्ताडम्=ऊर बडवून.

पटाक्षेपेण=(एकाएकीं) पट (पडदा) बाजूस सारून.

शूलः आयतनं (निवासस्थानम्) **येषां ते**। शूळाचा ज्यांना घराइतकाच दीर्घ सहवास घडतो असे; फांशी देणारे.

न व्यापादयितव्यः–(वि+आ+पद् च्या प्रयोजकाचें कर्म० विध्यर्थी विशेषण) =ठार मारला न जावा.

अमात्य, किमिदम्—तूं सुरक्षित राहून स्वामिकार्य साधावेंस, यासाठीं मी हा खटाटोप केला, आणि तूं तर आतां येथें येऊन तो सर्व फुकट घालविलास ! हें काय ?

त्वदीय...तुझ्या (मजवरील) उपकाराच्या कांहीं अंशाची ही फेड आहे.

स्वार्थ एव...(म्हणजे तुझे प्राण वांचवून माझा मित्र मी परत मिळविला हा) मी स्वार्थच साधला.

कृतम् उपालम्भेन=अलं निन्दया.

असज्जनेषु रुचिर्यस्य सः (कलिः)–ज्याला दुर्जनच आवडतात असा.

येन=चन्दनदासेन.

औशीनरीयम्=शिवि राजाचें. उशीनर देशचा राजा औशीनर. **तस्य=औशी-नरीयम्.**

बुद्ध=(शुद्धाचरणी) बौद्ध भिक्षु.

क्लिष्टम्=फिकें पाडलें.

यत्कृते=ज्या (माझ्या) साठीं.

तव वध्यत्वं गतः=तुझा वध्य झाला, (तुला वध्य वाटला).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१. सूक्तिसुधातुषारा: (तृतीयो निस्यन्द:)

पदलालित्यम् = नादमधुर शब्दरचना.

तस्य = दिलीपस्य = दिलीपाला.

आर्तस्य = रोग्याला.

उरगेण सर्पेण क्षता । = सर्पानें जखम केलेली, दंशिलेली.

मायाविषु मायिन: = कपटी लोकांशीं कपटाचरण करणारे.

अविज्ञातेऽपि बन्धौ—आपल्या हितकर्त्याला—मग तो अनोळखी असला तरी—पाहिल्याबरोबर. एखादे वेळीं एखाद्या माणसाकडे बघितल्याबरोबर आपणांस नकळत आनन्द (किंवा कांहीं बाबतींत तिरस्कारहि) वाटतो. त्याची उपपत्ति लावण्याचें काम हें वाक्य थोड्याफार प्रमाणांत करितें.

किंसखा (कुत्सित: सखा) = नालायक मित्र.

शास् = सल्ला देणें.

हितात् = हितकर्त्यापासून.

लघयन् (लघु पासून साधित धातूचें वर्त० वि०) = क:पदार्थ लेखणारा.

भूति = मोठेपणा, वैभव.

अन्यत: = दुसऱ्याकडून; उसनें.

सज्जनै: आचरिता ।

सरणि: = पद्धत, रीत.

अणीयसि कारणे = अगदीं क्षुल्लक गुणाबद्दल. (अणु = लहान, यापासून तरवाचक)

अनणीयान् = **महीयान्** = फार मोठा.

सन्दर्श्यते = दाखविला जातो.

टीप :—यासारख्याच अर्थाच्या भर्तृहरीच्या पुढील ओळी पहा :—

परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसन्त: सन्ति: सन्त: कियन्त: ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विराजमाना—याचा अर्थ येथें **वर्तमाना** (असणारी) येवढाच घ्यावा.

नन्दनः = आनंद देणारा. हें वर्णन **नृसिंहाचें** आहे.

नोदनः = नाश करणारा. (**नुद्** धातूच्या प्रयोजकापासून.)

वेदनिन्दिनः = वेदनिन्दकस्य (हिरण्यकशिपोः). या शब्दाचा संबंध ' **नोदनः** ' याकडे घ्यावा.

दिवं दुदाव = स्वर्गाला पीडा देता झाला. (दु = 'पीडा देणें' चें द्वि० भू०)

नादेन = गर्जनेनें.

दाने—(दो = फाडणें, या धातूपासून) = (हिरण्यकशिपूचें पोट) फाडतेवेळीं.

दानवान् नन्दयति (तोषयति) **इति दानवनन्दी** (हिरण्यकशिपुः) **तस्य दाने**।

टीप :—यांतील **दाने** व **नोदनः** हे शब्द अपरिचित असले, तरी केवळ दण्डीचें पदलालित्य या श्लोकांत फार चांगलें दिसून येतें, म्हणूनच हा येथें घेतला आहे.

अनुहुंकुरुते = हुंकारानें प्रत्युत्तर देतो; प्रतिगर्जना करितो.

गोमायुरुतानि = कोल्ह्यांचीं ओरडणीं, कोल्हेकुई.

वि-स्मयः—(विगतः स्मयः यस्मात् सः) = निगर्वी.

किञ्चन = (स्वतःवर केलेला) कोणताहि (उपकार.)

जातु = केव्हांहि.

परेषु = शत्रुषु.

अल्पकः = क्षुद्र, नीच माणूस.

किल याचा नेहमींचा अर्थ "लोक म्हणतात कीं" असा आहे, पण येथें ' खलु ' असा घ्यावा.

हन्त = अरेरे. आनन्दोद्गार काढतांनाहि ' हन्त ' च म्हणतात.

मनसाऽपि = कल्पनेंत देखील.

कस्तूरिकाजनने शक्तिं बिभर्ति धारयति इति । (उप० तत्पु०)

गुणः खल्वनु...थोड्याफार अशाच अर्थाची "Respect is commanded; not demanded" ही इंग्रजींतील म्हण ध्यानांत ठेवावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपेयेषु...भावार्थ असा, कीं लोकांस ज्यांच्या संपत्तीचा उपयोग होऊं शकत नाहीं, अशांवरच लक्ष्मीचा वरदहस्त असलेला कित्येक वेळां आढळून येतो. **अपेयेषु**=अपेयजलेषु (अपेयं जलं येषु) असा अर्थ घ्यावा.

न हि चन्द्रात् आतपः—सज्जनापासून पीडा कधींहि होणार नाहीं, हा भावार्थ.

अपि ग्रावा...इ०–हें वाक्य भवभूतीच्या काव्याचें वैशिष्ट्य सांगूं शकतें. करुणरसानें ओथंबलेलें त्याचें काव्य वाचून खरोखर दगडहि रडेल, व वज्राचेंहि हृदय विदीर्ण होईल. भवभूतीच्या नाटकांत मात्र 'दण्डकारण्यांत रामाचा सीतेबद्दलचा विलाप ऐकून दगडहि रडले,' असा या वाक्याचा सम्बन्ध आहे.

सर्वमतिमात्रं...इ०—या अर्थाचीं पुढील तिन्ही वाक्यें पहा: (१) **अति सर्वत्र वर्जयेत्** । (२) अति तेथें माती. (३) Extremes should be avoided.

---

२२. भोजमुद्दिश्य कालिदासस्य चरमग्रन्थः ।

चरमः=अखेरचा, (आमच्यावरील) शेवटचा श्लोक.

क्रुद्धः—याला कारण कालिदासाचें भोजावरील उत्कट प्रेम हें होय. भोजाच्या मरणाची कल्पनाहि त्याला असह्य झाली.

कापालिक=योगी, वैरागी. **कपालं भिक्षापात्रं, तेन चरति जीवति इति कापालिकः** । कालिदासास शोधण्यासाठीं राजानें इतका खटाटोप केला, यावरून त्याचेंहि कालिदासावरील प्रेम व्यक्त होतें.

सामपूर्वं=सौजन्यानें, आर्जवानें.

स्थिति=वास्तव्य.

भोजः कुशली किम् ?—कालिदासाचा हा पहिलाच प्रश्न त्याचें भोजावरील प्रेम दाखवितो. यावावत कालिदासाचें मेघदूतांतील '**पूर्वाभाष्यं सुलभविपदां प्राणिनामेतदेव**' (श्लो. ९७.) हें, व **शेक्स्पिअरचें** हॅम्लेटमधील "Where love is most; fear is most" हें, अशीं दोन वाक्यें पहा.

किं मया वक्तव्यम् ?=मी आपणांस काय सांगावें ?

अतिशयवार्ता=(कांहीं) कमजास्त बातमी. (हा शब्द ध्यानांत ठेवावा.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धारा=धारानगरी.

निरालम्बा =(निर्गतः आलम्बः यस्याः सा) निराश्रया, अनाथ.

खण्डिताः=निस्तेज.

विसंज्ञः (विगता संज्ञा यस्मात् सः)=मूर्च्छित.

अयं भोज एव...इ०—तेवढ्यावरून कालिदासानें 'हा भोजच' असें ओळखावें, ही गोष्ट काय दाखविते ?

झटिति=लौकर, तावडतोब.

मण्डिताः =सतेज, प्रफुल्लित (**शब्दशः** अर्थ—अलंकृत).

सन् (भक्कम, चांगला) **आधारः यस्याः सा** ।

---

२३. परमेश्वर परिपालय ।

विषयाणां विषयेषु वा ('विषयां' संबंधींची) **मृगतृष्णा** (वृथालोभ.)

सत्यपि भेदापगमे=तुझ्यामाझ्यामधील भेद नष्ट झाला असतांहि; मी तुझ्याशीं एकरूप झालों असतांहि.

तवाहं...इ०—म्हणजे मी तुझा (अंश) आहें; तूं माझा (अंश) नाहींस.

सामुद्रः=**समुद्रस्य अयं**=समुद्राचा (भाग, अंश)

तारङ्गः=तरंगाचा.

उद्धृतः नगः येन सः । (गोवर्धन) पर्वत उचलणारा.

नगान् भिनत्ति इति नगभिद् इन्द्रः । तस्य अनुजः । वामनावताराचे वेळीं विष्णु हा इन्द्राचा धाकटा भाऊ झाला होता. म्हणूनच त्यास '**उपेन्द्र**' असेंहि म्हणतात.

दनुजकुलं दानवकुलं तस्य अमित्र ! शत्रो !

मित्रश्च शशी च मित्रशशिनौ (सूर्यचन्द्र) **तौ दृष्टी** (डोळे) **यस्य सः** ।

प्रभवति (**प्रभावशालिनि, समर्थे**) **भवति** (**त्वयि**) **दृष्टे सति, भवतिरस्कारः** (संसाराबद्दल अप्रीति) **न भवति किम्** ।

मत्स्यादिभिः...मत्स्यादि दहा अवतारांनीं पृथ्वीवर उतरणाऱ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवता वसुधाम् = पृथ्वीचें रक्षण करणाऱ्या (तूं, तुझ्याकडून).

गुणमन्दिर = गुणांचें निधान, माहेरघर.

भवः जलधिः इव, तस्य मथने मन्दरः इव(त्वम्) = भवसागराचें मन्थन करण्याचे कामीं मन्दरपर्वताप्रमाणें असणारा (तूं.)

दरम् = भीतिम्

तावकौ = तुझे.

षट्पदी = षण्णां पदानां समाहारः । = 'नारायण' पासून 'चरणौ' अखेरच्या सहा शब्दांचा समूह. 'षट्पदी' आणि (वदन) 'सरोजे' असा शब्दप्रयोग केल्यानें 'षट्पदी- भ्रमरी–कमलांत वास करिते, त्याप्रमाणें ही षट्पदी – सहा शब्दांचा समूह–माझ्या मुखांत राहो,' अशी उपमाहि सूचित होते.

॥ शुभं भूयात् ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar